# सत्र – १ : घटक – १

# भारतीय अर्थव्यवस्थेची मुलभूत वैशिष्ट्ये

## (Basic Features of Indian Ecomomy)

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

  १.२.१ भारत एक विकसनशील अर्थव्यवस्था-वैशिष्ट्ये

  १.२.२ भारत एक मिश्र अर्थव्यवस्था-वैशिष्ट्ये

  १.२.३ भारतीय अर्थव्यवस्थेतील रचनात्मक बदल

  १.२.४ भारतीय अर्थव्यवस्था आणि सर्वसमावेशक विकास

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द व अर्थ

१.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ आधिक वाचनासाठी पुस्तके

### १.० **उद्दिष्ट्ये : (Objectives)**

प्रस्तुत घटकाच्या अभ्यासानंतर आपणांस पुढील बाबींचे आकलन होईल.

१) भारतीय अर्थव्यवस्था एक विकसनशील अर्थव्यवस्था म्हणून असणारी वैशिष्ट्ये लक्षात येतील.

२) भारतीय अर्थव्यवस्था एक मिश्र अर्थव्यवस्था म्हणून तिच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करता येईल.

३) स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भारतीय अर्थव्यवस्थेतील रचनात्मक बदल लक्षात येतील.

४) भारतीय अर्थव्यवस्थेतील सर्वसमावेशक वृद्धी अभ्यासता येईल

## १.१ प्रस्तावना : (Introduction)

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि दिनांक २६ जानेवारी १९५० रोजी देशाने प्रौढ मतदानावर आधारलेल्या प्रजासत्ताक लोकशाहीचा स्वीकार केला. भारतासारख्या खंडप्राय देशाची मागासलेली अर्थव्यवस्था गतिमान करून, आर्थिक प्रगतीचा दर वाढवून व त्यायोगे रोजगारनिर्मिती करून सर्वसामान्य माणसाचे राहणीमान उंचावणे ही उद्दिष्ट्ये साध्य करणे हे प्रमुख आव्हान अर्थव्यवस्थेसमोर होते. त्यासाठी आर्थिक नियोजनाचा स्वीकार करण्यात आला. राजकीय लोकशाहीशी सुसंगत असे 'कल्याणकारी राज्य' स्थापन करणे, हेच आर्थिक नियोजनाचे प्रधान उद्दिष्ट्य होते. गेली ६० वर्षे कार्यान्वित असलेल्या आर्थिक नियोजनातून भारताच्या आर्थिक विकासात अनेक स्थित्यंतरे निर्माण झाली. यामध्ये १९५१ ते १९९० या काळात शासनाचा अर्थव्यवस्थेतील परिणामकारक हस्तक्षेप असण्याची गरज प्रतिपादित करण्यात आली. तर दुसऱ्या कालखंडात म्हणजेच १९९१-९२ पासून आर्थिक धोरणामध्ये शासनाचा हस्तक्षेप कमी करुन सर्व आर्थिक व्यवहार प्रामुख्याने बाजार यंत्रणेच्या माध्यमातून करणे हे नवीन आर्थिक धोरणाचे वैशिष्ट्यपूर्ण मानता येईल.

भारतीय अर्थव्यवस्थेत अनेकविध कारणांमुळे प्राथमिक, द्वितिय व तृतीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणांत रचनात्मक बदल होत गेले आहेत. या बदलांचा परिणाम म्हणून अर्थव्यवस्थेचा विकासाचा दर वाढला आहे. त्याचबरोबर काही आव्हानेही अर्थव्यवस्थेसमोर उभी राहिली आहेत. त्यादृष्टीने भारतीय अर्थव्यवस्था म्हणून कोणती वैशिष्ट्ये आहेत त्यांचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. त्याचबरोबर विकासाच्या प्रवाहात अर्थव्यवस्थेतील सर्व स्तरामधील घटकांचा विकास झाला किंवा नाही हे पाहणेदखील आवश्यक ठरते. यासाठी अकराव्या पंचवार्षिक योजनेपासून 'सर्वसमावेशक विकास' हे नियोजनाचे मुख्य लक्ष्य ठरविले गेले प्रस्तुत घटकामध्ये आपण या सर्व बाबींवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करणार आहोत.

## १.२ विषय विवेचन : (Subject Description)

प्रस्तुत घटकामध्ये आपण भारतीय अर्थव्यवस्थेची एक विकसनशील अर्थव्यवस्था आणि मिश्र अर्थव्यवस्था म्हणून वैशिष्ट्ये, भारतीय अर्थव्यवस्थेतील रचनात्मक बदल तसेच भारतीय अर्थव्यवस्था व सर्वसमावेशक वृद्धी या बाबींचा अभ्यास करणार आहोत.

### १.२.१ भारत एक विकसनशील अर्थव्यवस्था वैशिष्ट्ये : (India A Developing Economy-Characteristics) :

भारत ही एक अल्पविकसित अर्थ व्यवस्था आहे सध्या देशातील सुमारे २२% लोक दारिद्र्यावस्थेत आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात भारताचा आर्थिक विकास मोठ्या प्रमाणात झाला असला तरी आजही अर्थव्यवस्थेसमोरील मूलभूत प्रश्न सुटलेले नाहीत. भारतातील दारिद्र्य चिरस्थायी स्वरूपाचे आहे. आजही उपलब्ध नैसर्गिक साधनसामग्रीचा पुरेपुर वापर होत नाही. म्हणून भारत हा अल्प उत्पन्नपातळी असणारा

विकसनशील देश मानला जातो.   देशाचा अल्पविकसितपणा हा मुख्यत्वे दारिद्रय, शहरी व ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण, देशातील उपलब्ध पायाभूत सोयीसुविधा लोकसंख्येची गुणवत्ता, शैक्षणिक प्रगती यासारख्या निकषांवर मोजला जातो. देशाच्या अल्पविकसीतपणाच्या विविध व्याख्या केला जातात त्यापैकी कांही महत्त्वाच्या व्याख्या आपणास पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) भारतीय नियोजन मंडळ :** ज्या राष्ट्राची उपलब्ध असलेल्या श्रमशक्तीचा व नैसर्गिक साधनसंपत्तीचा पूर्णपणे वापर करण्याची क्षमता नसेल त्या राष्ट्रास अल्पविकसित राष्ट्र म्हणावे.

**२) जेकब वायनर :** ''विपुल साधनसंपत्ती असूनही तिचा पुरेपूर वापर न केल्यामुळे देशातील लोकांचे राहणीमान न्यूनतम पातळीवर असते, अशा देशास अल्पविकसित राष्ट्र म्हणतात''

**३)जागतिक विकास अहवाल २००६ :** जागतिक बँकेने सन २००६ मध्ये प्रकाशित केलेल्या 'जागतिक विकास अहवालात' अल्प विकसित राष्ट्रांची विभागणी २००४ सालाचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्न विचारात घेऊन पुढील तीन गटात केली आहे.

**अ) अल्प उत्पन्न गटातील देश –** ज्या राष्ट्रांचे दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न ८२५ डॉलर्स किंवा त्यापेक्षा कमी आहे असे देश

**ब) मध्यम उत्पन्न गटातील देश –** ज्या राष्ट्रांचे दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न ८२६ डॉलर्स से १००६५ डॉलर्सपर्यंत आहे असे देश

**क) उच्च उत्पन्न गटातील देश –** ज्या राष्ट्रांचे दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न १००६६ डॉलर्स किंवा त्याहून जास्त आहे अशी राष्ट्रे

अल्पविकसितपणाच्या वरील व्याख्यांचा विचार करता भारतीय अर्थव्यवस्थेची नेमकी कोणती वैशिष्ट्ये आहेत ते पाहणे उचित ठरते. भारतीय अर्थव्यवस्था एक विकसनशील अर्थव्यवस्था यादृष्टीने पुढील वैशिष्ट्ये महत्वाची ठरतात.

**१) अल्प दरडोई उत्पन्न** (Low per Capita Income)

विकसित देशांशी तुलना करता भारताचे दरडोई उत्पन्न अल्प आहे. १९५० पूर्वी भारतीय अर्थव्यवस्था ही पाश्चिमात्य राष्ट्रांच्या तुलनेत अत्यंत गरीब होती. १९५० नंतर ही आर्थिक दरी कमी होण्याऐवजी वाढत गेलेली दिसते. १९६० ते १९८० या काळात जगातील विकसित राष्ट्रांच्या दरडोई उत्पन्नवाढीचा दर भारताच्या कितीतरी पटीने अधिक होता. मात्र १९९० ते २००३ या काळात भारतातील दरडोई उत्पन्नवाढीचा दर विकसित देशांपेक्षाही जास्त होता. असे असले तरी सध्या अमेरिका, जर्मनी, जपान, इंग्लंड इत्यादी विकसित राष्ट्रांच्या तुलनेने भारताचे दरडोई उत्पन्न अल्प आहे. ही बाब आपणास पुढील कोष्टक क्रमांक १.१ वरून लक्षात येईल.

**कोष्टक क्रमांक १.१**

**भारतातील दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाची विकसित देशांशी तुलना**
**(बाजार किंमतीनुसार, आकडे अमेरिकन डॉलर्स)**

| अ.नं. | देश | विनिमय दरावर आधारित | खरेदीशक्ती समतेवर आधारित |
|---|---|---|---|
| १. | स्वित्झर्लंड | ५६३७०* | ४१८३०* |
| २. | अमेरिका | ४७२४० | ४६७३० |
| ३. | जपान | ३७८७० | ३३२८० |
| ४. | जर्मनी | ४२५६० | ३६९६० |
| ५. | इंग्लंड | ४१५२० | ३७३६० |
| ६. | भारत | ११८० | ३२६० |
| ७. | चीन | ३५९० | ६७७० |

संदर्भ : The World Bank, World Development Indicators 2010

* सदरचे आकडे सन २००८ मधील आहेत.

कोष्टक क्रमांक १.१ वरून स्पष्ट होते की, अमेरिकेचे दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न हे विनिमय दरानुसार भारताच्या ४० पट अधिक आहे. तर खरेदीशक्ती समता दरानुसार १४.३ पट जास्त आहे.

**२) व्यावसायिक रचना :** (Occupational Structure)

अल्पविकसित राष्ट्रांचे एक प्रमुख वैशिष्टय म्हणजे ही राष्ट्रे मुख्यत्वे प्राथमिक वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर करीत असतात.भारतातील ५८% कर्ती लोकसंख्या शेती क्षेत्रात गुंतली असून राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा हिस्सा फक्त १३.५% (सन २०१२) आहे. जगातील इतर विकसित देशांशी तुलना करता शेतीक्षेत्रात गुंतलेल्या लोकसंख्येचे प्रमाण भारतात खूपच अधिक आहे. भारत आणि जगातील कांही प्रमुख विकसित देशामधील शेती आणि औद्योगिक क्षेत्रात गुंतलेल्या लोकसंख्येचे प्रमाण कोष्टक क्रमांक १.२ मध्ये दर्शविले आहे.

**कोष्टक क्र १.२**

**निवडक देशातील कर्त्या लोकसंख्येची क्षेत्रीय विभागणी (२००८)**

| अ.नं. | देश | शेतीक्षेत्रात गुंतलेली लोकसंख्या(%) | स्थूल देशांतर्गत उत्पादनाचा क्षेत्रीय वाटा (%) | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | शेती | उद्योग | सेवा |
| १. | इंग्लंड | १ | ०.७ | २३.७ | ७५.६ |
| २. | अमेरिका | ४ | १.३ | २१.८ | ७६.९ |
| ३. | जपान | ५ | १.४ | २९.३ | ६९.३ |
| ४. | थायलंड | ४५ | ११.६ | ४४.२ | ४४.२ |
| ५. | पाकिस्तान | ५२ | २०.४ | २६.९ | ५२.७ |
| ६. | चीन | ४७ | ११.३ | ४८.६ | ४०.१ |
| ७. | भारत | ५८ | १७.५ | २८.८ | ५३.७ |

संदर्भ: World Bank, World Development Indicators, 2010

कोष्टक क्रमांक १.२ वरून हे स्पष्ट होते की, भारतातील शेती क्षेत्रात गुंतलेल्या कर्त्या लोकसंख्येचे प्रमाण आजही अधिक आहे. त्याचवेळी दुसऱ्या बाजूला शेती क्षेत्रातील दरडोई उत्पादकताही अत्यंत कमी आहे. तसेच शेती क्षेत्र हा तणावाखाली असणारा उद्योग आहे.

### ३) लोसंख्येचा अतिरिक्त भार : (Heavy Population Pressure)

स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारतामध्ये जननदर उच्च राहिला. आणि मृत्युदर मात्र वैद्यकीय प्रगतीचा परिणाम म्हणून वेगाने घटला ह्यामुळे निव्वळ लोकसंख्यावाढीचे प्रमाण वाढून अनुउत्पादक उपभोक्त्यांचा भार कर्त्या लोकसंख्येवर पडला. सन १९५१ ते २०११ या काळात भारताची लोकसंख्या ३६.१ कोटीवरून १२१ कोटीपर्यंत वाढली सन १९४१-१९५० या दशकात लोकसंख्यावाढीचा दर १.९३% पर्यत वाढला. २००१ ते २०१० या काळात लोकसंख्या वाढीचा वार्षिक सरासरी दर हा १.३७% च्या दरम्यान राहिला. याचे महत्वाचे कारण म्हणजे देशातील मृत्यूदरात वेगाने होत असलेली घट होय. वाढत्या लोकसंख्येबरोबर देशात अन्नधान्य कपडे, निवारा, शिक्षण आरोग्यविषयक गरजांची तीव्रता वाढली. वाढती लोकसंख्या अर्थव्यवस्थेमध्ये श्रमशक्तीचा पुरवठा ही वाढवते. सद्या श्रमसंख्या वार्षिक १.८% दराने वाढत असून त्या तुलनेत अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रात रोजगार संधी वाढत नसल्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न गंभीर बनत आहे. परिणामी सामाजिक कल्याणात घट होत आहे.

### ४) भांडवल निर्मितीचा अल्प दर : (Low Rate of Capital Formation)

भारतीय अर्थव्यवस्थेच्या अल्पविकसितपणाचे एक महत्वाचे लक्षण म्हणून या वैशिष्ट्याकडे

पाहिले जाते. २० व्या शतकातील ५ वे  व ६ वे दशक हे भांडवल तुटवड्याच्या बाबतीत अत्यंत प्रतिकूल असे होते. प्रतिव्यक्ती भांडवल उपलब्धता आणि दरडोई भांडवल निर्मिती या दोहोंचाही भारतात प्रमाण कमी आहे. १९९०-९१ ते २००४-०५ या काळात स्थूल देशांतर्गत बचतीच्या दरात २३.१% वरून ३२.४४ पर्यंत वाढ झाली. मात्र याच काळात स्थूल भांडवल निर्मितीत २३.३% वरून ३३.८% पर्यत वाढ झाली. सन २००८ मध्ये भारतातील एकूण भांडवल निर्मितीचा दर हा ३९.७% इतका आहे. ही बाब देशाच्या आर्थिक विकासास चालना देणारी आहे. मात्र जगातील काही विकसित देशांशी तुलना करता भांडवल निर्मितीतील वाढीबरोबर भारतात प्रतिव्यक्ती विविध सेवांचा उपभोग मात्र वाढला नाही. आजही अमेरिका, इंग्लंड, जपान, आणि चीन या देशात दरडोई वीज वापराचे प्रमाण अनुक्रमे ७७६६ किलो वॅट ३४६४ किलोवॅट ४०१९ किलोवॅट आणि १४८४ किलोवॅट इतके आहे. तर भारतात हे प्रमाण दरडोई  फक्त ५२९ किलोवॅट इतके आहे.

प्रा. कोलीन क्लार्क यांच्या अंदाजानुसार, देशातील सद्याच्या राहणीमानाच्या पातळीचे नियमन करण्यासाठी अस्तित्वातील गुंतवणुकीत आणखी ४% नी वाढ करण्याची गरज आहे. भारताच सद्य स्थितीतील आर्थिक घसरण थांबविणे आणि राहणीमानाची पातळी स्थिर राखणे यासाठी एकूण भांडवल निर्मितीचा दर किमान १४% असणे आवश्यक आहे. तरच भारताच्या आर्थिक विकासास गती प्राप्त होऊन लोकसंख्येचे राहणीमान उंचावण्यास मदत होईल.

**५) उत्पन्न वितरणातील विषमता : (Maldistribution of Wealth)**

रिझर्व्ह बँकेच्या जुलै १९९१ ते जून १९९२ या काळातील ग्रामीण आणि शहरी कुटुंबांच्या उत्पन्न वितरणाचे सर्वेक्षण असे सांगते की, देशात ग्रामीण व शहरी भागात उत्पन्न वितरणात कमालीची विषमता आहे. ग्रामिण भागातील  २७% कुटुंबांचे उत्पन्न हे २०,००० रूपयांपेक्षा कमी आहे. व या लोकांकडे एकूण ग्रामीण संपत्तीच्या फक्त २.४% संपत्ती आहे. तर त्याच वेळी २४% कुटुंबांचे उत्पन्न २०,००० ते ५०,००० रूपये या दरम्यान आहे. या लोकांकडे एकूण ग्रामीण संपत्तीच्या ७.५% संपत्ती आहे. देशातील ५१% कुटुंबाकडे एकूण संपत्तीच्या १०% संपत्ती आहे तर ९.६% श्रीमंत कुटुंबाकडे २.५ लाखापेक्षा अधिक तर एकूण संपत्तीच्या ४९% संपत्ती आहे

त्याचवेळी शहरी भागातील परिस्थितीत त्याहीपेक्षा बिकट आहे. शहरातील ५०.७% कुटुंबांकडे ५०,००० रूपयापेक्षा कमी संपत्ती आहे. व हे प्रमाण एकूण संपत्तीच्या ५.३% एवढे अल्प आहे. या उलट शहरातील एकूण संपत्तीच्या जवळजवळ ६६% संपत्ती ही १४.२% कुटुंबांच्या मालकीची आहे. त्यांचे उत्पन्न ३.२५  लाखापेक्षा अधिक आहे. आज देशातील ५०% पेक्षा अधिक लोकांना आपल्या किमानगरजा पूर्ण करणे उपलब्ध उत्पन्नातून शक्य होत नाही . त्याप्रमाणे देशातील श्रींमत व्यक्ती लग्न व इतर समारंभावर कोट्यावधी रूपये खर्च करताना दिसतात. याउलट गरीब व्यक्ती त्यांच्याकडे असणारी तुटपुंजी बचत सुप्तावस्थेत ठेवतात. परिणामी देशाचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न वाढूनही बचत व गुंतवणुकीचा

दर वाढत नसल्याचे दिसते. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाचा दर मंद राहिला आहे.

### ६) मानवी भांडवलाचा निकृष्ट दर्जा (Poor Quality of Human Capital)

भारतीय अर्थव्यवस्थेचे मानवी भांडवलाचा निकृष्ट दर्जा हे एक लक्षण मानले जाते. जगातील बहुतांश अल्पविकसित राष्ट्रे ही निरक्षर ही आर्थिक विकासातील महत्वाची अडचण असते. भारताला स्वातंत्र्य मिळून ६१ वर्षे झाली तर अद्यापही सुमारे ३५% लोकसंख्या अशिक्षित आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबर शिक्षण, आरोग्य, निवारा यासारख्या गरजांवर पुरेसा खर्च न केल्यामुळे देशातील मानवी भांडवलाचा दर्जा निकृष्ट आहे. भारतापेक्षा चीनची लोकसंख्या जास्त असुनही मानव विकास निर्देशांकात चीनचा क्रमांक भारतापेक्षा वरचा आहे. स्वातंत्र्योत्तर काळात देशातील मानवी भांडवलाचा दर्जा सुधारण्यासाठी व शिक्षणविषयक सुधारणा घडवून आणण्यासाठी व शिक्षणविषयक सुधारण घडवून आणण्यासाठी नेमण्यात आलेल्या कोठारी कमिशन व इतर समित्यांनी वेळोवेळी केलेल्या शिफारशीनुसार देशातील स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाचा ६% हिस्सा शिक्षणावर खर्च करावा असे म्हटले असतानाही सध्या आपण ३.५% खर्च हा शिक्षणावर करीत आहोत. त्यामुळे देशात शिक्षण व प्रशिक्षणाच्या सुविधा पुरेश्या प्रमाणात उपलब्ध न झाल्यामुळे भारतातील मानवी भांडवलाचा दर्जा निकृष्ठ राहिला आहे. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमांतर्गत मानव विकास निर्देशांकानुसार जगातील राष्ट्रांची क्रमवाशी लावली आहे यामध्ये मुख्यत्वे सरासरी आर्युमान प्रौढ साक्षरता शैक्षणिक नोंदणीचे प्राथमिक, द्वितीय व तृतीय स्तरावरील प्रमाण आणि वास्तव दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पादन याबाबींचा विचार केला आहे. अत्यंत दुर्देवाची बाब म्हणजे सन २००७ च्या मानव विकास निर्देशांकानुसार जागतिक स्तरावर भारताची क्रमवारी १३४ वी आहे. तर याच वेळी चीन ९२ क्रमांकावर आहे. साहजिकच भारताला विकासाची उच्चतम पातळी गाठण्यासाठी मानवी भांडवलाच्या गुणवत्तेत मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. जगातील काही प्रमुख राष्ट्रांची मानव विकास अहवाल २००७ नुसार क्रमवारी कोष्टक क्र. १.३ मध्ये दर्शविली आहे.

**कोष्टक क्रमांक १.३**

**मानव विकास निर्देशांकाची तुलनात्मक स्थिती (२००७)**

| अ. क्र. | देश | सरासरी आयुर्मान (२००७) | प्रौढ साक्षरता % | एकत्रित नोंदणी प्रमाण | दरडोई वास्तव स्थूल देशांतर्गत उत्पादन $ | मानव विकास निर्देशांकातील क्रमवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कॅनडा | ८०.६ | ९९.० | ९९.३ | ३५८१२ | ४ |
| २ | अमेरिका | ७९.१ | ९९.० | ९२.४ | ४५५९२ | १३ |
| ३ | जपान | ८२.७ | ९९.० | ८६.६ | ३३६३२ | १० |
| ४ | फ्रान्स | ८१.० | ९९.० | ९५.४ | ३३६७४ | ०८ |
| ५ | इंग्लंड | ७९.३ | ९९.० | ८९.२ | ३५१३० | २१ |
| ६ | चीन | ७२.९ | ९३.३ | ६८.७ | ५३८३ | ९२ |
| ७ | भारत | ६३.४ | ६६.० | ६१.० | २७५३ | १३४ |

**संदर्भ :** UNDP, Human Development Report 2009

### ७) तांत्रिक मागासलेपणा : (Technological Backwardness)

भारतासारख्या विकसनशील देशात संथगतीने आधुनिक तंत्रज्ञानाचा जरी वापर केला जात असला तरी अस्तित्वातील बहुतांश उद्योगातून होणारे उत्पादन हे जुनाट व मागासलेला तंत्रज्ञानाच्या साहाय्याने केले जाते. विकसित आणि विकसनशील देशातील औद्योगिक उत्पादकतेत फार मोठी दरी आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे अल्पविकसीत राष्ट्रांमधील तांत्रिक मागासलेपणा होय. शेती व उद्योगात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास बेरोजगारी वाढेल अशी भिती व्यक्त केली जाते. त्यामुळे प्रचलित परंपरागत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उत्पादन केले जाते. त्याचप्रमाणे भारतातील विविध क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यासाठी कुशल मनुष्यबळ नाही. इतकेच नव्हे तर विकसीत देशांशी स्पर्धा करण्यासाठी प्रचलित तंत्रज्ञानात सुधारणा घडवून आणण्यासाठी पुरेसे भांडवल भारतात उपलब्ध नाही. परिणामी भारतातील विविध क्षेत्राची उत्पादकता न्यूनतम पातळीवर राहिलेली दिसून येते. मात्र अलिकडील काळात आर्थिक सुधारणा कार्यक्रमांचा परिणाम म्हणून भारतातील औद्योगिक क्षेत्रात स्पर्धेत टिकण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापरास सुरूवात झाली आहे.

### ८) राहणीमानाचा निकृष्ट दर्जा : (Lower Standard of Living)

भारतातील लोकांचा आहार हा संतुलित स्वरूपाचा नाही यामध्ये उष्माकांचे अल्प प्रमाण आणि प्रोटीनचा अभाव आहे. सन १९९९ मध्ये देशातील लोकांना मिळणाऱ्या आहारातून फक्त १९९९ मध्ये देशातील लोकांना मिळणाऱ्या आहारातून फक्त २४९६ कॅलरीज मिळत होत्या. तर त्याचवेळी विकसित देशांमधील लोकांना आहारातून ३४०० कॅलरीज प्राप्त होत होत्या. सध्या देशात दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण हे २८% च्या दरम्यान आहे. या लोकांना आवश्यक असणाऱ्या दैनंदिन २१०० कॅलरीज ही त्यांच्या आहारातून मिळत नाहीत. भारतीय लोकांच्या आहारात डाळी व कडधान्याचे प्रमाण जास्त असून मांस, मासे, फळे व भाजीपाला यांचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे विकसीत देशांशी तुलना करता भारतातील लोकांना ५०% पेक्षाही कमी प्रोटीन्स आहारातून मिळतात. जागतिक विकास निर्देशांकानुसार भारतातील ४६% मुले कुपोषित आहेत. भारतीय लोकांच्या आहारात प्रोटीनचे प्रमाण दरदिवशी फक्त ५९ ग्रॅम इतकेच आहे. तर विकसित राष्ट्रांमध्ये हेच प्रमाण दुप्पट आहे. सन १९६० मध्ये देशातील लोकांना प्रति दिन ४८ मिलिलीटर दुध उपलब्ध होत होत तर सन २००३-०४ मध्ये हे प्रमाण ८३ मिलिलिटर पर्यंत वाढले आज सरासरी ११० मिलि लिटर दूध प्रतिदिन लोकांना आहारातून प्राप्त होते. तर विकसित राष्ट्रांमध्ये दुप्पट आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार देशातील फक्त ३६% कुटुंबांना शुद्ध पिण्याचे पाणी नळाद्वारे उपलब्ध होते, देशातील ५२% लोकांना कायम स्वरूपाची घरे उपलब्ध आहेत. मात्र १८% लोक हे पूर्णपणे बेघर आहेत. मुंबई, दिल्ली, कोलकत्ता, बेंगलोर, चेन्नई यासारख्या महानगरांमध्ये घरांचा प्रश्न हा भयंकर बनला आहे. आजही देशातील सुमारे ३५% लोकांकडे रेडीओ, टी. व्ही, टेलिफोन, सायकल व स्कूटर यासारख्या सुविधा उपलब्ध नाहीत. थोडक्यात भारतीय लोकांचा आहार, राहणीमान, पायाभूत सुविधा इत्यादी बाबतीतील निकृष्ट प्रमाणामुळे लोकांची दरडोई उत्पादकता व कार्यक्षमता विकसित

देशांशी तुलना करता अत्यंत कमी असल्याचे दिसून येते.

### ९) वाढती बेरोजगारी (Increasing Unemployment)

भारतात अल्पविकसीतपणामुळे अर्धबेकारी, छुपी बेरोजगारी तसेच सुशिक्षितांमधील बेरोजगारी असे बेरोजगारीचे विविध प्रकार आढळून येतात. स्वातंत्र्योत्तर काळात वाढत्या लोकसंख्येबरोबर बेरोजगारांची संख्या वाढत गेलेली दिसून येते. विकसीत देशांमध्ये मागणीतील कमतरतेमुळे व व्यापार चक्राच्या स्वरूपामुळे बेरोजगारी निर्माण होते. भारतात मात्र भांडवलाच्या कमतरतेमुळे औद्योगिक क्षेत्रातील बेरोजगारी तीव्रता कमी होण्याऐवजी वाढत आहे. कृषीप्रधान अर्थव्यवस्थेमुळे आजही देशात शेती क्षेत्रात आवश्कतेपेक्षा जास्त मजूर गुंतले आहेत. त्यामुळे अशा शेतमजूरांची सीमान्त उत्पादकता शून्य किंवा उणे आहे. ग्रामीण भागात छुप्या बेरोजगारीचा शेती क्षेत्रावर ताण पडला आहे. नियोजनकाळात रोजगारसंधी वाढविण्याचे प्रयत्न करूनही बेरोजगारांची संख्या वाढतच आहे. राष्ट्रीय नमुना पाहणीने केलेल्या अंदाजानुसार १० व्या पंचवार्षिक योजनेच्या सुरूवातीस ३.५ कोटी लोक बेरोजगार होते. भारतातील ९.२१% कार्यक्षम लोकसंख्या बेरोजगारी व अर्धबेकारीत जीवन जगत आहे. बेरोजगारीचे हे वाढते प्रमाण कसे कमी करावयाचे हा नियोजनकारांसमोरील महत्वाचा प्रश्न आहे.

### १०) लोकसंख्याविषयक वैशिष्ट्ये : (Demographic Characteristics)

देशाच्या अविकसितपणाच्या लक्षणा संदर्भात लोकसंख्या या घटकाचा विचार करता, लोकसंख्यंची घनता, सरासरी, आयुर्मान आणि अर्भक मृत्यू दर या बाबी महत्वाचा ठरतात. भारतात सन २००६ मध्ये लोकसंख्येची घनता ही ३७३ प्रति चौ. कि. मी. इतकी होती. त्याचवेळी जागतिक सरासरी लोकसंख्येची घनता ही ५० प्रति चौ. कि. मी. इतकी होती. तर अमेरिकेत ३३ कॅनडा आणि ऑस्ट्रोलियामध्ये ३ ते ४ प्रति चौ. कि. मी. इतकी होती. चीनमध्येसुद्धा लोकसंख्येची घनता प्रति चौ. कि. मी. १४१ इतकी होती. लोकसंख्येची अधिक घनता ही जमीन आणि नैसर्गिक साधनसंपत्तीवरील अतिरिक्त भार निर्देशित करते. सन २००१ च्या जनगणनेनुसार ३३.५% लोकसंख्या ही ० ते १४ या वयोगटात आहे ६१.५% लोकसंख्या ही कर्ती लोकसंख्या म्हणजेच १५ ते ६४ वयोगटातील आहे आणि ५% लोकसंख्या ही ६५ वर्षे आणि त्यापेक्षा अधिक वयोगटातील आहे. यावरून ही बाब स्पष्ट होते की, विकसित देशांपेक्षा भारतामध्ये मुलांची संख्या अधिक आहे. परिणामी अनुत्पादक लोकसंख्येचे प्रमाण अधिक असल्याने एकंदर साधन सामग्रीवरील ताण वाढला आहे. सन २००६ मध्ये वरील परिस्थिती असली तरी सन २०२६ मधील परिस्थिती, कर्त्या लोकसंख्येचे प्रमाण हे सर्वाधिक असणार आहे असा अंदाज आहे. १५ ते ६४ वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण जवळ जवळ ६८.४% इतके असणार आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेवरील व साधनसामग्रीवरील ताण कमी होणार आहे. परिणामी भविष्यातील दोन ते तीन दशकांमध्ये भारताला लोकसंख्येचा लाभांश (Demographic Dividend) प्राप्त होणार आहे. मात्र भारतासमोरील दुसरा महत्वाचा प्रश्न हा या कर्त्या लोकसंख्येस उद्योग आणि सेवा क्षेत्रामध्ये कशाप्रकारे सामावून घ्यावयाचे

हा असणार आहे. यासाठी देशासमोर तरूणांसाठीचा नवा उपक्रम (Youth Ajenda) तयार करण्याची आवश्यकता आहे.

**११) धाडशी संयोजक व नेतृत्वाचा अभाव :**

**(Lack of Aggresive Enterprenenr and Leadership)**

भारतात औद्योगिकदृष्ट्या प्रगत राष्ट्रांप्रमाणे संयोजकांचा साठा उपलब्ध नाही. वाढत्या लोकसंख्येचा परिणाम म्हणून स्वातंत्र्योत्तर काळात पुरेशा प्रमाणात प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देता आल्या नाहीत. परिणामी शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रमात तफावत आढळून येते. इंग्लंड, अमेरिका, जपान, रशिया यासारख्या राष्ट्रात संयोजन कौशल्य असलेल्या व्यक्तिमुळे औद्योगिक भरभराट होऊन राष्ट्रीय व दरडोई उत्पन्नात वाढ झालेली दिसून येते. भारतात मात्र अशा प्रयोगशील तंत्रज्ञांचा व व्यवस्थापकांचा अभाव असल्यामुळे अर्थव्यवस्थेचा पुरेसा गतीने विकास घडवून आणता आला नाही

**१२) कृषीप्रधान अर्थव्यवस्था (Agrobased Ecomomy)**

विकसनशील अर्थव्यवस्थेमध्ये प्रामुख्याने ४० ते ७०% लोकसंख्या शेती क्षेत्रावर आधारीत असते. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये ५८% लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. म्हणूनच स्थूल देशांतर्गत उत्पादनात शेती क्षेत्राचा हिस्सा अधिक असतो जगातील शेतीवर आधारित अर्थव्यवस्थांमध्ये शेती क्षेत्राचा हिस्सा पुढीलप्रमाणे आहे टांझानिया ४५%, घाना ३९%, युगांज ३४%, पाकिस्तान २२ %, बांगला देश २१% भारताच्या बाबतीत मात्र स्थूल देशातंर्गत उत्पादनात शेती क्षेत्राचा हिस्सा हा १३.५% इतका आहे. प्रा. जे. के. गालब्रेथ यांच्या मते ''पूर्णपणे शेतीवर आधारीत असलेल्या देशातील शेतीची प्रगती कमीच असते.'' भारतीय शेतीच्या बाबतीत हीच बाब दिसून येते. शेतीक्षेत्रात तंत्रवैज्ञानिक मागासलेपणा जाणवतो. शेतीमध्ये रासायनिक खते, आधुनिक बियाणे, औषधे इत्यादीची कमतरता जाणवते.

**१३) उपभोगाचे सामाजिक व आर्थिक निर्देशक**

**(Socio-economic Indicators of Consumption)**

कोणत्याही राष्ट्राचा अल्पविकसितपणा हा दरमाणशी कॅलरीजचा उपभोग दरहजारी लोकसंख्येमागे डॉक्टर, मोटारी, टेलिफोन, टि. व्ही. इत्यादीची उपलब्धता या सामाजिक निर्देशंकाद्वारे मोजता येतो. जगातील काही प्रमुख देशाशी तुलना करता भारतात या वस्तूंची कमतरता जाणवते गेल्या ६० वर्षात लोकसंख्येत वेगाने वाढ होत गेली. या लोकसंख्येच्या राहणीमानात सुधारणा करण्यासाठी प्रत्येक पंचवार्षिक योजनेत कल्याणाचे कार्यक्रम राबविण्यात आले. सामाजिक आर्थिक सुधारणाविषय कार्यक्रमांवरील अंदाजपत्रकीय तरतूदही वाढविण्यात आली. मात्र आजही देशात सुविधांची उपलब्धता पुरेशा प्रमाणांत झाली नाही. कोष्टक क्रमांक १.४ मध्ये जगातील काही विकसित देशातील जीवनमानाच्या सामाजिक आर्थिक निर्देशकांच्या उपलब्धतेची तुलना केली आहे.

**कोष्टक क्रमांक १.४**

**निवडक देशांच्या जीवनमानाचे सामाजिक-आर्थिक निर्देशक -२००६**

| अ. क्र. | देश | दरडोई उपभोग (ग्रॅम) | | कॅलरी | दर दहा हजारी लोकसंख्ये मागे | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | चरबी | प्रोटीन | | टि. व्ही. | डॉक्टर |
| १ | भारत | ४५ | ५९ | २४९६ | १२७० | ६ |
| २ | चीन | ७१ | ७७ | २८९७ | ५७१० | १०.६ |
| ३ | जपान | ८३ | ८६ | २९३२ | १२०२० | १९.८ |
| ४ | अमेरिका | १४३ | ११२ | ३६९९ | १२८६० | २५.६ |
| ५ | इंग्लंड | १४१ | ९३ | ३२७६ | १६१६० | २३.० |

**संदर्भ : Tata Services Limited & Statistical outline of India**

### १४) इतर घटक (Other Factors)

भारतीय अर्थव्यवस्थेच्या अल्पविकसितपणाचा विचार करताना देशात अस्तित्वात असलेल्या इतर वैशिष्ट्यांचाही विचार करणे आवश्यक ठरते. यामध्ये प्राुख्याने पायाभूत सुविधांचा अपुरा विकास, आर्थिक मागासलेपणा सार्वत्रिक दारिद्र्य बाजारपेठेतीला अपूर्णता इत्यादी घटक विचारात घ्यावे लागतात त्याचप्रमाणे वाहतूक व दळण वळणाच्याा सुविधांमधील कमतरता विकासप्रक्रियेवर परिणाम करीत आहेत. भारतीय समाजव्यवस्थेत आढळून येणाऱ्या रूढी, परंपरा व जातीयतेमुळे अनेक सामाजिक प्रश्न आर्थिक विकासात अडथळे निर्माण करीत आाहेत. शासनाला सामाजिक समस्या सोडविण्यासाठी करावा लागणारा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. परिणामी विकास कामासाठीच्या खर्चात कपात करावी लागत आहे. आर्थिक सुधारणा कालखंडात देशात अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. या आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता भारतीय अर्थव्यवस्थेत वाढविण्याची आवश्यकता आहे. विकासातील प्रादेशिक विषमता हा अलिकडील एक अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. ही विषमता दूर करण्यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

**✻ स्वयंअध्ययन प्रश्न :**

**अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडा**

१) भारताने नवे आर्थिक धोरण............यावर्षी स्वीकारले

अ) १९८० ब) १९९० क) १९९१ ड) २००१

२) भारतात सध्या...........लोक शेती क्षेत्रावर आधारित आहेत.

अ) ५१% ब) ५५% क) ५८% ड) ६८%

३)  भारतातील लोकसंख्यावाढीचे प्रमुख कारण........ हे आहे.

अ) उच्च जननदर ब) अल्प मृत्यूदर क) वैद्यकीय सुधारणात वाढ ड) अ,ब. व क बरोबर

४) भारताच्या विकासातील प्रमुख अडथळा.......आहे

अ) अतिरिक्त लोकसंख्या ब) उत्पन्न वितरणातील विषमता

क) भांडवल निर्मितीचा अल्प दर ड) अ, ब, आणि क बरोबर

५) भारताच्या मानवी भांडवलाविषयी खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे?

अ) भारतात कर्त्या लोकसंख्येचा अभाव आहे

ब) भारतातील मानवी भांडवलाचा दर्जा निकृष्ट आहे

क) भारतात ६० पेक्षा अधिक वयोगटातील लोकसंख्या जास्त आहे

ड) भारतात स्त्री-पुरूष प्रमाण हे ११९० इतके आहे.

६)  सन२००७ च्या मानव विकास निर्देशाकांनुसार भारताची जागतिक पातळीवर क्रमवारी............इतकी आहे.

अ) १२७  ब) १३०  क) १३५  ड) १३४

७) भारताच्या औद्येगिक मागासलेपणाचे प्रमुख कारण कोणते आहे?

अ) तांत्रिक मागासलेपणा  ब) श्रमशक्तीचा अभाव

क) श्रमशक्तीच्या स्थलांतराचा अभाव  ड) उद्योजकांचा अभाव

८) भारतीय शेती क्षेत्रात कोणत्या प्रकारची बेरोजगारी आढळते?

अ) सुशिक्षितांची बेरोजगारी  ब) प्रछन्न बेरोजगारी

क) अर्ध बेरोजगारी  ड) घर्षणात्मक बेरोजगारी

### २.२.२ भारत एक मिश्र अर्थव्यवस्था वैशिष्ट्ये : (India A Mixed Economy-Characterstics)

२० व्या शतकाच्या सुरूवातीस जगातील बहुतांश राष्ट्रांनी मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली. भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे दोष १९२९ च्या महामंदीने जगासमोर स्पष्ट झाले. लॉर्ड केन्स यांनी आपल्या १९२६ मध्ये लिहिलेल्या End of Laisse Falre या ग्रंथात भांडवलशाहीचे दोष स्पष्ट केले होते. मिश्र अर्थव्यवस्थेची कल्पना ही मुख्यत्वे भांडवलशाही अर्थव्यवस्था व मिश्र अर्थव्यवस्था यातील दोष टाळून त्यातील गुणांचे एकत्रीकरण आहे असे म्हणता येईल. मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्र यांचे सहअस्तित्व

असते. सरकार बाजारव्यवस्थेत हस्तक्षेप करून खाजगी क्षेत्रातील उत्पादन व किंमत नियंत्रित करीत असते. भारताने १९४७ पासून मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. भारत एक मिश्र अर्थव्यवस्था म्हणून काही महत्वाची वैशिष्ट्ये आपणास पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१. प्रा. सॅम्युअलसन :**

''ज्या पद्धतीत उत्पादन उपभोग व विभाजनाच्या प्रक्रियेत बाजारातील घटकांबरोबर सरकारी नियंत्रणेदेखील कार्य करीत असतात अशा अर्थव्यवस्थेस मिश्र अर्थव्यवस्था असे म्हणतात.''

**२. अर्थशास्त्र शब्दकोष :**

''ज्या आर्थिक पद्धतीत भांडवलशाही व समाजवादी अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये दिसून येतात, ज्यामध्ये मध्यवर्ती सरकारमार्फत आर्थिक व्यवहारांचे नियमन केले जाते ती अर्थव्यवस्था म्हणजे मिश्र अर्थव्यवस्था होय.''

**वैशिष्ट्ये :** मिश्र अर्थव्यवस्था म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये आपणास पुढीलप्रमाणे विषद करता येतील.

**१. सार्वजनिक व खाजगी क्षेत्राचे सहअस्तित्व**
**(Co-existance of Public and Private Sector)**

मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्राचे सहअस्तित्व असते. अर्थव्यवस्था प्रमुख दोन क्षेत्रामध्ये विभाजित झालेली असते. त्यापैकी एका क्षेत्राच्या विकासाची जबाबदारी सरकारकडे सोपाविलेली असते. सरकारी क्षेत्रातील उद्योगांची मालकी व व्यवस्थापन सरकारचे असते सरकारने नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचारी या उद्योगांचे व्यवस्थापन पाहत असतात. राष्ट्राच्या दृष्टीने अतिमहत्वाचे असणारे उद्योग सार्वजनिक क्षेत्रात कार्यरत असतात. उदा. मूलभूत उद्योग, संरक्षण साहित्य निर्मिती उद्योग, अणुशक्ती, स्थापत्यशास्त्र उद्योग, हे खाजगी क्षेत्राकडे सुपूर्द केलेले असतात. या उद्योगांची मालकी व व्यवस्थापन हे खाजगी संघटकाकडे असते. उद्योगांचा विकास व विस्तार करणे तसेच नवीन उद्योग उभारणे याबाबत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य खाजगी क्षेत्राला असते. उपभोग्य वस्तू निर्मितीचे उद्योग व लघु व कुटिरोउद्योग शेती व शेती आधारित उद्योग तसेच काही प्रमाणात मोठे व भांडवली उद्योगही खाजगी क्षेत्राच्या मालकीचे असतात या उद्योगांना आवश्यक ते मार्गदर्शन वित्तीय व इतर सहाय्य हे सरकारकडून केले जाते. कारण अर्थव्यवस्थेचा अपेक्षित दराने विकास व्हावयाचा असेल आणि नियोजनाची उद्दिष्ट्ये गाठावयाची असतील तर सरकार व खाजगी क्षेत्र या दोन्ही क्षेत्रांनी एकत्रिपणे काम करण्याची आवश्यकता असते. म्हणजेच सन १९४८च्या औद्योगिक धोरणापासून सरकारने परिस्थितीनुरूप आवश्यक ते बदल करून सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्र यांच्या अखत्यारीत कोणते उद्योग असावेत या विषयी योग्य ते विश्लेषण केले आहे.

## २. किंमतयंत्रणेची भूमिका (Role of Price Mechamism)

मिश्र अर्थव्यवस्थेत किंमतयंत्रणा आणि सरकारी हस्तक्षेप या दोन्ही बाबी महत्वाच्या असतात. सार्वजनिक क्षेत्रातून घेतले जाणारे उत्पादन, त्यांच्या किंमती, सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूकीचे निर्णय, तंत्रज्ञानाचा वापर या विषयीचे निर्णय सरकार व सरकारने नियुक्ते केलेल्या अधिसत्तांद्वारे घेतले जातात. मात्र मिश्र अर्थव्यवस्थेतील खाजगी क्षेत्रातील वरील बाबीविषयीचे निर्णय हे किंमतयंत्रणेद्वारा घेतले जातात. खाजगी क्षेत्राचा मूळ हेतू हा नफा महतमीकरण व उत्पादन कोणासाठी करावयाचे? उत्पादन कसे करावयाचे? व उत्पादन कोणासाठी करावयाचे? या बाबतीतील निर्णय घेण्यासाठी किंमतयंत्रणा महत्वाची भूमिका बजावत असते. साधनसामग्रीचे वाटप मिश्र अर्थव्यवस्थेत अंशत: पद्धतीने आणि अंशत: सरकारी मार्गदर्शनाचे होते. योग्य ती उपाययोजना करत असते कारण ज्यायोगे केवळ खाजगी क्षेत्राच्या नफा महत्तमीकरणाऐवजी देशातील लोकांच्या कल्याणासाठी त्यांचे कार्य चालावे या हेतूने सरकार परवाना पद्धती सुरू करते. सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक असणारे उद्योग सुरू व्हावेत यासाठी सरकार परवाना देते. तसेच गरजेनुसार एखाद्या उद्योगाचा विस्तार करण्यास किंवा नवीन उद्योग स्थापन करण्यासाठी परवाना देते. परवाना पद्धती हे असे शस्त्र आहे की, ज्याद्वारे सरकार औद्योगिक गुंतवणूक व उत्पादन यांना शिस्त लावते. योग्य अशा मौद्रिक व राजकोषीय धोरणाने सरकार खाजगी क्षेत्राचे नियंत्रण व नियमन करते. उद्योगातील खाजगी क्षेत्राची गुंतवणूक वाढावी यासाठी सरकार पायाभूत सोयी सुविधांची उपलब्धता अनुदाने, कर सवलती, अल्पदरात वित्तपुरवठा यासारख्या प्रोत्साहनपर बाबीची अंमलबजावणी करत असते.

## ३.मूलभूत उद्योगातील सार्वजनिक क्षेत्राचा सहभाग (Public Sector Paticipation in Giant Industries)

भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा अर्थव्यवस्थेसमोर गुंतवणुकीसाठी भांडवलाचा तुटवडा, मागासलेल्या पायाभूत सोयी-सुविधा, औद्योगिकरणाचा अत्यल्प दर, बेरोजगारी, शेती क्षेत्राचे मागासलेपण तसेच सामाजिक असमतोल यासारख्या समस्या आवासून उभ्या होत्या. यातनू मार्ग काढण्यासाठी औद्योगिक क्षेत्रामध्ये सरकारी हस्तक्षेपाची नितांत आवश्कता होती. त्या अनुषंगाने १९५६ चे औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणानुसार देशातील मूलभूत व अवजड उद्योग वाहतूक व्यवस्था ऊर्जेचे ऊर्जानिर्मितीचे प्रकल्प यासारख्या उपक्रमांच्या विकासास सार्वजनिक क्षेत्राकडून हातभार लावण्यात आला. परिणामी आज हे उपक्रम देशाच्याा विकासात महत्वाची भूमिका बजावताना दिसतात. या उद्योगामध्ये १९५० ते १९९० च्या दशकात सार्वजनिक क्षेत्राकडून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यात आली त्याचा फायदा सध्या खाजगी क्षेत्रातील उद्योगांच्या विकासासाठी होताना दिसतो. भारताने मिश्र अर्थव्यवस्थेला स्वीकार केल्यानंतर देशाच्याा दूरगामी विकासाच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या अतिमहत्वाच्या उद्योगातील मोठ्या प्रमाणातीला गुंतवणूक सार्वजनिक क्षेत्रामार्फत झाल्यामुळे औद्योगिकरणाचा पाया रचला गेला असे म्हणता येईल.

**४. खाजगी क्षेत्रावरील सरकारचे नियंत्रण व नियमन (Government Control and Regulation of Private Sector)**

भशारतासारख्या मिश्र अर्थव्यवस्थेमध्ये खाजगी क्षेत्राकडून औद्योगिक क्षेत्राचा मोठा भाग व्यापला आहे. मात्र हे क्षेत्र त्याच्या एकंदरीत कामकाजाच्या बाबतीत पूर्णपणे मुक्त ठेवले गेले नाही. सरकार खाजगी क्षेत्राला शिस्त लावण्यासाठी व त्याचे नियमन करण्यासाठी आर्थिक विषमता कमी करणे, लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवणे आणि आर्थिक विकासाचा दर वाढविणे ही उद्दिष्ट्ये कायम राहिली आहेत.

**५. आर्थिक नियोजन (Economic Planning)**

भारताने १९५१ पासून पंचवार्षिक योजनांच्या सहाय्याने आर्थिक नियोजन करण्याची प्रक्रिया स्वीकारली मिश्र अर्थव्यवस्थेमध्ये खाजगी क्षेत्राला जरी स्वातंत्र्य असले तरी सार्वजनिक क्षेत्रातील व्यवहारांशी त्याचा योग्य समन्वय साधण्यासाठी त्यांचे नियमन करून नियोजनाच्या सहाय्याने योग्य दिशा देण्याचा प्रयत्न केला जातो. मिश्र अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक नियोजनाला अनन्य साधारण महत्व असते. खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील उत्पादन साधनांची योग्य विभागणी करून उत्पादनाची लक्ष्ये गाठत यावीत यासाठी आर्थिक नियोजन महत्वचे ठरते. भारताने गेल्या ६५ वर्षात नियोजनाच्या माध्यमातून देशाच्या विकासाची उद्दिष्ट्ये साध्य करण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये मुख्याचे रोजगार वृद्धी करणे, दारिद्र्य कमी करणे, राहणी मान उंचावणे

**६. मक्तेदारीवर नियंत्रण (Control of Monopoly)**

मिश्र अर्थव्यवस्थेमध्ये सरकार मक्तेदारी नियंत्रित करणे व तिचे नियमन करणे यासाठी प्रयत्नशील असते. भारतामध्ये स्वातंत्र्योत्तर काळात मोठ्या प्रमाणात 'मक्तेदारी गृहे'(Monopoly Houses) निर्माण होत आहेत. मक्तेदारांनी सार्वजनिक हित साध्य करण्यासाठी काम करावे. हा सरकारचा उद्देश असतो. त्यामुळे खाजगी क्षेत्राने कोणत्या पद्धतीचे उत्पादन करावे या बरोबरच उत्पादनाची किंमत काय असावी हे ठरविण्यासाठी हंगामी व कायमस्वरूपी आयोगांची स्थापना केली आहे. मक्तेदारांनी केलेल्या गुंतवणुकीवर त्यांना योग्य प्रमाणात नफा प्राप्त व्हावा मात्र किमतीद्वारे ग्राहकांचे आर्थिक शोषण होऊ नये याकडेही जाणिवपूर्वक लक्ष केंद्रित केले जाते. सरकार कायद्याच्या आधारे व्यावसायिक एकत्रीकरणातून समाजहित धोक्यात येऊ नये यासाठी प्रयत्न करीत असते.

**७. आर्थिक विषमतेत घट (Reduction In Economic Inqualities)**

मिश्र अर्थव्यवस्थेमध्ये सरकार समाजाच्या उत्पन्न व संपत्तीतील विषमतेची दरी कमी करण्यासाठी विविध मार्गांनी प्रयत्न करते. आर्थिक विषमता ही देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासातील महत्वाचा अडथळा असते. श्रीमंत वर्गाकडून गरिबांच्या कल्याणात घट होऊ नये. यासाठी सरकार उत्पादनात वाढ करून तसेच सर्वांना समान संधी देण्याचा प्रयत्न करते. की ज्यामुळे सामाजिक न्याय प्रस्थापित होईल

व आर्थिक आणि सामाजिक कल्याण साध्य होईल. भारतासारख्या मिश्र अर्थव्यवस्था असणाऱ्या देशात सामाजिक व आर्थिक विषमता कमी करण्यासाठी स्वतंत्रपणे 'सामाजिक न्याय विभाग' स्थापन करण्यात आला आहे. राजकोषीय धोरणाच्या माध्यमातून सरकार आर्थिक विषमता कमी करण्यासाठी प्रगतीशील कर रचनेचा अवलंब करीत आहे. श्रीमंतावर उत्पन्नकर, संपत्तीकर, देणगीकर, भांडवली लाभ कर यासारखे कर आकारून महसूल जमा करते तर दुसरीकडे गरिबांना मोफत शिक्षण, औषधे, घरे इत्यादींची व्यवस्था करते. आर्थिक विषमता कमी करणे हे मिश्र अर्थव्यवस्थेचे प्रमुख उद्दिष्ट असल्यामुळे भारताने समाजवादी समाजव्यवस्था स्वीकारली आहे. तसेच पंचवार्षिक योजनेचे मुख्य उद्दिष्ट हे 'कल्याणकारी राज्याची निर्मिती' निश्चित केले आहे.

**८. उपभोक्तांच्या सार्वभौमत्वाचे संरक्षण : (Protection of Consumers Sovergnity)**

मिश्र अर्थव्यवस्थेमध्ये उपभोक्तांच्या सार्वभौमत्वाला अनन्यसाधारण महत्व दिले जाते. उपभोक्तांना त्यांचा आवडीनिवडीनुसार बाजारातून वस्तू खरेदी करण्याचे स्वातंत्र्य असते. खाजगी क्षेत्र उपभोक्तांच्या म्हणजेच बाजारपेठेच्या मागणीनुसार उत्पादन करीत असते. तसेच उपभोक्तांच्या आवडीनुसार उत्पादनात गुणात्मक व सुधारणा व विविधता निर्माण करीत असतात. मात्र याचवेळी किंमतवाढीचा धोका निर्माण होऊ शकतो. तेव्हा सरकार सार्वजनिक लाभाच्या दृष्टीने किंमत नियंत्रित करण्याचा प्रयत्न करते. परिणामी खाजगी उत्पादक आणि भांडवलदार यांच्याकडून उपभोक्तांची केली जाणारी पिळवणूक थांबविली जाते. त्याचबरोबर सरकार सामाजिक गरजेच्या आणि अल्पपुरवठा सार्वभौमत्व अबधित राखण्यासाठी सरकार उत्पादन कार्यात स्वत: भाग घेण्याबरोबरच खाजगी क्षेत्राला मार्गदर्शनही करते.

**९. सरकारचे स्थान महत्त्वाचे : (Place of Government is Important)**

मिश्र अर्थव्यवस्थेमध्ये सार्वजनिक व खाजगी क्षेत्राचे सहअस्तित्व असले तरी ही सरकारचे स्थान हे अत्यंत महत्वाचे असते. खाजगी क्षेत्राला उत्पादन कार्यासाठी स्वातंत्र्य दिले. असले तरी ही त्यांच्या कृतीवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष नियंत्रण सरकारवर अनेक प्रकारच्या सामाजिक व आर्थिक जबाबदाऱ्या असतात. दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी विविध योजना तयार करणे व राबविणे आर्थिक विकासासाठी खाजगी व सार्वजनिक क्षेत्रात योग्य असा गुंतवणुकीचा कार्यक्रम आखणे अधिकार व सत्तेचे विकेंद्रीकरणे करणे अर्थव्यवस्थेची परिपूर्ण माहिती व्हावी यासाठी विविध क्षेत्रांकडून माहितीचे संकलन करणे, प्रादेशिक विषमता दूर करण्यासाठी विविध महमंडळांच्या स्थापनेतून प्रादेकिश विकासाच्या तसेच क्षेत्रीय विकासाच्या योजना राबविणे यासारखी अत्यंत महत्वाची कार्ये सरकारला करावी लागतात. म्हणूनच मिश्र अर्थव्यवस्थेमध्ये सरकारचे स्थान हे महत्वाचे असते.

**१०. इतर वैशिष्ट्ये : (Other Characteristics)**

वरील वैशिष्ट्यांबरोबर मिश्र अर्थव्यवस्थेची इतरही काही महत्वाची वैशिष्ट्ये आहेत. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उद्योगाचे राष्ट्रीयीकरण ही बाब कर्ज मानली जाते. तर समाजवादी अर्थव्यवस्थेमध्ये सर्वच

उद्योग राष्ट्रीयकृत असतात. मिश्र अर्थव्यवस्थेमध्ये मात्र देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने व समाजहिताच्या दृष्टीने महत्वाचे उद्योग व बँका यांचे राष्ट्रीयीकरण केले जाते. त्याचबरोबर उत्पादन कार्याच्या जबाबदारीची जाणीव सामाजिक हित व नफा यांचा योग्य समन्वय किंमत यंत्रणेचे महत्व ही काही मिश्र अर्थव्यवस्थेची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत.

**❊ स्वयंअध्ययन प्रश्न :**

**अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडा**

१. मिश्र अर्थव्यवस्थेत..........सहअस्तित्व असते.

अ) खाजगी क्षेत्र व सहकारी क्षेत्र ब) सहकारी क्षेत्र व सार्वजनिक क्षेत्र

क) सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्र ड) संयुक्त भांडवली क्षेत्र व सहकारी क्षेत्र

२. मिश्र अर्थव्यवस्थेत..........ची भूमिका महत्वाची असते.

अ) सरकार ब) किंमतयंत्रणा व सरकार क) खाजगी क्षेत्र ड) शेती क्षेत्र

३. भारताने पंचवार्षिक योजनेची सुरूवात कोणत्या वर्षी केली?

अ) १९४७ ब)१९५० क) १९५१ ड) १९५६

४. भारताच्या ५ या पंचवार्षिक योजनेचे अंतिम ध्येय काय आहे?

अ) दारिद्र्य निर्मुलन ब) सामाजिक विषमता कमी करणे

क) न्यायासह विकास ड) कल्याणकारी राज्याची निर्मिती करणे

५. भारतात दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये........या क्षेत्रावर भर देण्यात आला होता.

अ) कृषी क्षेत्र ब) मूलभूत व अवजड उद्योग

क) कुटीर उद्योग व लघुउद्योग ड) सेवा क्षेत्र

६. आर्थिक विषमता कमी करण्यासाठी भारतात............ची स्थापना करण्यात आली आहे.

अ) आयकर विभाग ब) सामाजिक न्याय विभाग

क) आर्थिक विकास महामंडळ ड) पंचायतराज

### १.२.३. भारतीय अर्थव्यवस्थेतील रचनात्मक बदल (Structural Changes In Indian Economy)

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा अर्थव्यवस्थेतील कृषी, उद्योग व सेवा क्षेत्राची कामगिरी यावर अवलंबून असतो. याचा परिणाम समाजाच्या राहणीमानावरही होत असतो. भारतीय अर्थव्यवस्था

कृषीप्रधान मानली जात असली तरी १९७० च्या दशकानंतर कृषी क्षेत्राचा स्थूल देशांतर्गत उत्पादनातील हिस्सा घटताना दिसतो. तर उद्योग आणि सेवा क्षेत्राचा हिस्सा वेगाने वाढत असल्याचे दिसते. १९९० च्या दशकात स्वीकारण्यात आलेले समग्रलक्ष्मी आर्थिक उदारीकरणाचे धोरण आणि त्याद्वारे औद्योगिक क्षेत्रातील सार्वजनिक क्षेत्राची मक्तेदारी कमी करून गती देणारे ठरले. औद्योगिक आणि कृषी क्षेत्रात झालेल्या विकासोन्मुख बदलांमुळे सेवा क्षेत्राचा देखील विस्तार होण्यास मदत झाली. भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान असली तरी ही राष्ट्रीय उत्पन्नात संरचनात्मक बदल होऊन कृषी क्षेत्राचा क्रमांक सर्वात शेवटी तर सेवा क्षेत्र सर्वात वरच्या क्रमांकावर आहे. त्यादृष्टीने आपण भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी, उद्योग, सेवा तसेच सामाजिक क्षेत्रातील रचनात्मक बदलाचा आढावा घेण्याचा प्रयत्न करणार आहेत.

### भारतीय शेती क्षेत्रातील रचनात्मक बदल :
### (Structural Change in India's Agricultural Sector)

भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी शेतीक्षेत्राची अवस्था अत्यंत दयनीय स्वरूपाची होती. भारतीय शेतकरी सावकारी कर्जाच्या जाळ्यात अडकला होता. जमिनीचे विभाजन व तुकडीकरण झालेले होते. शेतकऱ्यांच्या निरक्षरतेमुळे व अज्ञानामुळे शेती परंपरागत पद्धतीने कसली जात होती. शेतीत रासायनिक खते, उच्च पैदास देणारी बियाणे, औषधे, आधुनिक अवजारे यांचा वापर केला जात नव्हता. बहुतांश शेती ही मान्सूनच्या लहरी पावसावर आधारित होती. शेती व शेतकऱ्याची उत्पादकता ही अत्यल्प होती. देशातील ७०% हून अधिक लोक शेतीवरच अवलंबून होते भारत-पाकिस्तान फाळणीनंतर देशात अन्नधान्याचा प्रश्न गंभीर बनल्याने अन्नधान्याची आयात करावी लागली. परिणामी स्वातंत्र्योत्तर काळात पहिला पंचवार्षिक योजनेत शेती क्षेत्राच्या विकासाला अधिक महत्व देण्यात आले. यामध्ये उत्पादनात वाढा करण्याबरोबरच कसेल त्याची जमीन, कुळकायदा, जमीन धारणा कायदा यासारखे जमीन सुधारणेचे प्रयत्न करण्यात आले. शेतजमिनीचे विभाजन व तुकडीकरण आळा घालून तुकडे जोड कार्यक्रम राबविण्याता आला. तसेच मृद्संधारणाची कामे करण्यात आली. सिंचन सुविद्यांमध्ये वाढ करण्यासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न केले गेले. संस्थात्मक वित्तपुरवठ्याच्या सुविधांमध्ये वाढ करून सावकारीचे उत्पादन करण्याचा प्रयत्न केला गेला. कृषी आदानांचा पुरवठा करण्यात आला. या सर्व प्रयत्नांचा परिणाम म्हणून भारताच्या शेतीक्षेत्राचा विकास होण्यास मदत झाली.

शेती क्षेत्राच्या विकासासाठी पहिला योजनेपासूनच प्रकर्षित सधन शेती जिल्हा कार्यक्रम राबविण्यात आला. तिसऱ्या योजनाकाळात 'उच्च पैदास देणाऱ्या बियाणांचा कार्यक्रम' राबविण्यात आला. यालाच शेती विकासाची नवीन व्यूहरचना असे म्हटले जाते. या पद्धतीनुसार कृषी क्षेत्रात पारंपारिक पद्धतीऐवजी व्यापारी दृष्टीकोणाने नवीन तंत्रपद्धती व व्यवस्थांचा अवलंब करून शास्त्रशुद्ध बियाणे रासायनिक खते, जंतू नाशके, पाणी पुरवठ्याच्या सुविधा, आधुनिक अवजारे, भांडवल पुरवठा इत्यादिचा वापर करण्यात येऊ लागला. परिणामी शेती क्षेत्रात 'हरितक्रांती' झाली. हरितक्रांतीमुळे कृषी उत्पादनात लक्षणीय वाढ झाली, यामध्ये मुख्यत्वे

संकरित बियाणांचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणांत राबविला गेला. यासाठी सरकारने विविध महामंडळांची स्थापना केली. हरितक्रांतीचा परिणाम म्हणून गहू, तांदूळ, कापूस आणि ऊस या पिकांच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणांत वाढ झाली. शेतकऱ्यांची उत्पन्न वाढून त्यांचे राहणीमान सुधारण्यास मदत झाली, मात्र दुसऱ्या बाजूला हरितक्रांती काही विशिष्ट पिकांच्या बाबतीत व काही राज्यामध्येच मर्यादित राहिली. त्यातून पिक रचनेत असमतोल निर्माण झाला. तसेच शेतकऱ्यांमध्ये गरीब व श्रीमंत अशी दरी निर्माण झाली. शेतीचे भांडवलीकरण होऊ लागली. यातून अनुपस्थित जमीन मालकांचा नवीन वर्ग निर्माण झाला.

१९८० च्या दशकात हरितक्रांतीचाच परिणाम म्हणून देशात दुग्धक्रांती झाली. भारतात श्री. वर्गीस कुरियन यांच्या पुढाकारातून 'दूध महापूर योजना' (Operation Flood Programme) राबविण्यात आली. भारत दुग्ध उत्पादन करणारा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा देश बनला. आर्थिक सुधारणा कालाखंडात भारतीय शेतीमध्ये अत्यंत महत्वाचे रचनात्मक बदल घडून आले. आर्थिक उदारीकरणाचा परिणाम म्हणून शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणांत भांडवलाचा वापर करण्यात येऊ लागला. फुलोत्पादन व फळशेतीच्या प्रमाणांत वाढ होऊ लागली. व्यापारी पिके होण्याकडे मोठ्या प्रमाणांत शेतकऱ्यांचा कल वाढलेला दिसून येतो. कंत्राटी शेतीसारखे प्रयोग शेतीक्षेत्रात सुरू झाले. यातून शेती व शेतकऱ्यांना लाभ मिळाले असले तरी काही आव्हाने निर्माण झाली आहेत. शेतकऱ्यांचे सिमान्तीकरण होऊ लागले. शेती क्षेत्रात बेरोजगारीच्या प्रमाणांत वाढ होऊ लागली. शेती हा व्यवसाय तोटा होणारा व्यवसाय म्हणून ओळखला जात आहे.

गेल्या ६० वर्षात शेतीक्षेत्राचा स्थूल देशांतर्गत उत्पादनातील हिस्सा सातत्याने घटत आहे. सन १९५०-५१ मध्ये शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा ५४% होता त्यामध्ये घट होऊन सन २०११-१२ मध्ये तो १३.५% झाला आहे. त्यामध्ये घट होऊन सन २०११-१२ मध्ये तो १३.५% झाला आहे. १९७० च्या दशकात शेतीक्षेत्रातून उत्पादित होणाऱ्या निव्वळ उत्पन्नाचा हिस्सा हा ८०% होता. तर नंतरच्या दशकात तो ६८%पर्यंत कमी झाला व पशूधनाचा कृषी क्षेत्राच्या उत्पन्नातील हिस्सा १५% पर्यंत वाढला. २०१० मध्ये पशूधनापासूनचा हिस्सा आणखी वाढून तो २५% पर्यंत पोहोचला १९६० मध्ये मत्स्य उत्पादनाचा कृषी क्षेत्रातील उत्पन्नात १% हिस्सा होता. सन २०१० मध्ये यात वाढ होऊन तो ५.१०% पर्यंत वाढलेला दिसून येतो.

### ❊ भारताच्या औद्योगिक क्षेत्रातील रचनात्मक बदल (Structural Change in India's Industrial)

१८ व्या शतकात जगात सर्वप्रथम औद्योगिक क्रांती झाली. त्यानंतर अमेरिका, जर्मनी, जपान इत्यादी राष्ट्रांमध्ये औद्योगिक क्रांती होऊन अर्थव्यवस्थांचे संक्रमण झाले. भारतातही औद्योगिकरणाची प्रक्रिया स्वातंत्र्यपूर्व काळातच सुरू झाली असली तरी तिला योग्य गती मिळू शकली नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात टाटा, बिर्ला, किर्लोस्कर यासारख्या उद्योजकांनी उद्योगांची स्थापना करून तसेच मुंबईतील कापड गिरण्यांच्या स्थापनेमुळे ब्रिटीशकालीन औद्योगिकरणाच्या दृष्टीने प्रयत्न सुरू करण्यात आले. त्या

दृष्टीने १९५६ मध्ये दुसरे औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले. यानंतर विविध योजनांच्या साहाय्याने भारताने औद्योगिक विकास साधनाचे दिसून येतो. भारताच्या औद्योगिक क्षेत्रातील रचनात्मक बदलाचा अभ्यास करताना त्याचे प्रमुख चार टप्पे पडतात.

**अ) १९५१ ते १९६५ मजबूत औद्योगिक पाया तयार करणे (Building up of Strong Industrial Base)**

पहिल्या तीन पंचवार्षिक योजनेत भारताचा औद्योगिक पाया मजबूत करण्याचे उद्दिष्ट ठरविले गेले मात्र खऱ्या अर्थाने दुसऱ्या योजनेपासून औद्योगिक क्षेत्राच्या विकासाकडे लक्ष देण्यात आले. या योजनेत भांडवली वस्तू उद्योग आणि मूलभूत उद्योगांच्या विकासावर भर देण्यात आला. लोखंड-पोलाद, उद्योग, अवजड यंत्रसामग्री यासारख्या उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्यात आली. परिणामी भारताच्या औद्योगिक उत्पादनात वाढ झाली. यातूनच भारताच्या भविष्यकालीन औद्योगिकरणाचा पाया बळकट झाला.

**ब) १९६५ ते १९८०औद्योगिक विकासाचा अल्प वेग आणि संरचनात्मक ऱ्हास (1965-1980 Industrial Declaration and Structural Retrogression)**

या १५ वर्षाच्या कालाखंडात औद्योगिक उत्पादनवाढीच्या दरात घट झाली. तसेच उद्योगांचा संरचनात्मक ऱ्हास झाला. तिसऱ्या योजनेत औद्योगिक वाढीचा दर ९.८% होता तो १९६५ ते ७६ या काळात वार्षिक ४.१% एवढा कमी झाला. औद्योगिक घसरणीचे महत्वाचे कारण म्हणजे, भांडवली वस्तू उद्योगाने पहिला तीन पंचवार्षिक योजनांमध्ये सातत्याने व महत्वपूर्ण वाढ केली मात्र १९६५ ते १९७६ या काळातील वाढ फक्त २.६% एवढी अल्प होती. मूलभूत उद्योगांच्या बाबतीतही हेच चित्र दिसते. औद्योगिक संरचनात्मक ऱ्हासामुळे भांडवली वस्तू उद्योगांचा व मूलभूत उद्योगांच्या विकासाच्या दरात घट झाली. डॉ. एन. के. राज यांच्या मते, शेती क्षेत्रातील अल्प वाढीमुळे औद्योगिक वाढ घटली कारण कच्चा मालाचा तुटवडा निर्माण झाला व दुसऱ्या बाजूला औद्योगिक वस्तूंच्या मागणीत वाढ झाली. काही अर्थतज्ञांच्या मते, या कालावधीत औद्योगक घसरण होण्याचे महत्वाचे कारण म्हणजे, सरकारचे चुकीचे औद्योगिक धोरण परवाना पद्धतीतील गुंतागुंत हे आहे.

**क) १९८० ते १९९१ औद्योगिक विकासाचा अल्प वेग आणि संरचनात्मक ऱ्हास (1965-1980 Industeria Deceleration and Structural Retrogression)**

औद्योगिक क्षेत्राच्या सुधारणांचा कालखंड म्हणून हा कालावधी ओळखला जातो. सन १९८१ ते १९९० या काळात मूलभूत वस्तू उत्पादन उद्योगाचा वाढीचा दर ८.७% वरून ३.८% पर्यंत कमी झाला. भांडवली वस्तू उत्पादन उद्योगांचा वाढीचा दर ६.२% वरून १७.४% पर्यंत वाढला अंत:स्थित वस्तू उत्पादन उद्योगांचा वाढीचा ४८.६% वरून ६.१% झाला. उपभोग्य वस्तूंच्या वाढीचा दरात ५.१% वरून १०.४% पर्यंत वाढ झाली. टिकाऊ वस्तूंच्या वाढीचा दर १४.३% वरून १४.८% झाला तर याच

काळात नाशवंत वस्तूंच्या उत्पादनाच्या वाढीचा दर ३.८% वरून ९.४% झाला. एकंदरीतच औद्योगिक क्षेत्राच्या सर्वसाधारण निर्देशांकात ६.४% वरून ८.३% पर्यंत वाढ झाली.

या कालखंडात औद्योगिक क्षेत्राच्या झालेल्या वाढीस नवे पर्व असे संबोधले जाते. या कालखंडात मूल्यवर्धित कारखानदारी क्षेत्रात व त्याच्या वापराने पायाभूत क्षेत्रात वेगाने वाढ झाली. १९८० मध्ये सरकारने स्वीकारलेले नवे औद्योगिक धोरण हे खऱ्या अर्थाने औद्योगिक व व्यापारी धोरणातील उदारीकरण होते. यामध्ये उद्योगांच्या प्रवेशावरील देशांतर्गत प्रतिबंध कमी करणे आणि उद्योगांच्या स्पर्धात्मकतेबाबत उपाययोजना करणे याचा समावेश होता. या कालावधीत देशामध्ये औद्योगिक विकासासाठी अत्यंत पोषक वातावरण लाभल्याने औद्योगिक क्षेत्राच्या विकासास मदत झाली.

**ड) १९९१ नंतरचा कालखंड आर्थिक सुधारणा काळ :**

**(1991 Economic Reforms Period)**

भारताने १९९१ मध्ये आर्थिक उदारिकरणाचे धोरण स्वीकारले. या धोरणानुसार औद्योगिक परवाना पद्धती शिथिल करण्यात आली. सार्वजनिक क्षेत्रासाठी राखीव असलेले काही उद्योग खाजगी क्षेत्रास खुले करण्यात आले. औद्योगिक क्षेत्रात विदेशी भांडवलाचा सहभाग वाढविण्याकडे भर देण्यात आला. आर्थिक सुधारणेच्या सुरवातीच्या काळात परदेशी चलनाच्या तुटवड्यामुळे काही प्रमाणात औद्योगिक विकासावर अनिष्ठ परिणाम झाला. १९९१ मधील रूपयाच्या अवमूल्यनाचा परिणाम म्हणून आयात महागली. भांडवली वस्तू चक्राला मंदीला तोंड दयावे लागले. खाजगी गुंतवणूक वेगाने वाढत नव्हती. सरकारने कोळसा व पेट्रोलियम पदार्थाच्या व्यवस्थापकीय किंमती वाढविल्यामुळे उत्पादन खर्च वाढला. सामाजिक आणि राजकीय अनिश्चिततेचा गुंतवणूक मागणीवर अनिष्ठ परिणाम झाला. १९९३–९४ नंतर मात्र औद्योगिक क्षेत्राच्या विकासात वाढ होऊ लागली. १९९१ च्या नवीन औद्योगीक धोरणाने औद्योगिक क्षेत्राला उत्तेजन मिळाले. या धोरणाने खाजगी औद्योगिक गुंतवणूकीचे विविध बाबींचे सार्वजनिक गुंतवणुकीवरील अवलंबित्व मोडून काढण्यात आले. खाजगी क्षेत्राची गुंतवणूक वाढू लागली. भविष्यात प्रचंड नफा मिळविण्यासाठी खाजगी संयुक्त मंडळनी त्यांच्या कारभाराची पुर्नरचना केली. औद्योगिक विलीनीकरण, बाजारविभागणी विदेशी भागिदारी यासारखी व्यूहरचना स्वीकारली उदारीकरणाच्या धोरणाने विदेशातील भांडवली वस्तू देशात येऊ लागल्या. तसेच देशांतर्गत वस्तूंना निर्यात सुलभ झाली. जवळजवळ २००० सालापर्यंत औद्योगिक वाढीचा दर उच्च होता मध्येच १९९८–१९९९ दरम्यान पुन्हा औद्योगिक घसरण होऊन औद्योगिक उत्पादन वाढीचा दर ४.२% झाला अलिकडील काळात मूलभूत धातू, धातू उत्पादने, यंत्रे, रसायने, पेट्रोकेमीकल्स, वाहन उद्योग यामध्ये वेगाने वाढ होऊन या उद्योगांचे अर्थव्यवस्थेतील महत्व वाढले आहे. आर्थिक सुधारणांचा परिणाम म्हणून औद्योगिक क्षेत्रात नवप्रवर्तने येत आहे. त्यातून रोजगाराच्या नवनवीन संधी निर्माण होत आहेत. मात्र औद्योगिक क्षेत्रातील नवे बदल हे प्रामुख्याने आधुनिक यंत्र व तंत्रज्ञानावर आधारित असल्याने कौशल्यप्राप्त असणाऱ्या श्रमशक्तीलाच रोजगार उपलब्ध होत आहे. रोजगार निर्माण करण्याची प्रचंड क्षमता असणाऱ्या लघु व कुटीर उद्योगांची मात्र ...होताना दिसते. औद्योगिक क्षेत्राच्या रचनात्मक बदलामुळे औद्योगिक

आजारपणात वेगाने वाढ होत आहे. विभागीय असमतोल निर्माण होत आहे. ही बाब अर्थव्यवस्थेच्या विकासात अडथळा निर्माण करणारी आहे. यासाठी योग्य-असे धोरणात्मक बदल करण्याची गरज आहे.

**❊ सेवा क्षेत्रातील रचनात्मक बदल : (Structural Changes In Service Sector)**

भारतीय अर्थव्यवस्थेतील रचनात्मक बदलाचा विचार करता पंचवार्षिक योजना काळात सन १९८० पर्यत सेवा क्षेत्राच्या विकासाचा दर हा अत्यंत कमी होता. १९५०-५१ ते १९७९-८० या काळात सेवा क्षेत्र ४.६% दराने विस्तारत होते. १९७९-८० ते १९९५-९६ या काळात सेवाक्षेत्राच्या विकासाचा दर हा ६.५% होता तर १९९५-९६ ते २०१०-११ या काळात सेवाक्षेत्र ९.५% दराने विस्तारत होते. आज सेवा क्षेत्राचा भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा हा ६०% वर पोहचला आहे आर्थिक सुधारणा काळात व्यापार, वाहतूक, दळणवळण आणि बँकिग व वित्तीय संस्था या सेवा क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा वाढविण्यासाठी कारणीभूत आहेत. १९८० च्या दशकामध्ये सेवाक्षेत्राच्या विकासामध्ये वाहतूक, दळणवळण आणि वित्तीयसेवा यांची भूमिका महत्वाची होती. मात्र नंतर आर्थिक उदारीकरणाचा परिणाम म्हणून व्यापार हे क्षेत्र सेवा क्षेत्राच्या विकासात भर घालताना दिसत आहे. गेल्या दोन दशकात सामाजिक आणि वैयक्तिक सेवा व सार्वजनिक प्रशासन आणि संरक्षण सेवा यांच्या विकासाचा दर घटता राहिला आहे. मात्र इतर सेवांचा विकास झपाट्याने होत आहे.याचे महत्वाचे कारण म्हणजे संघटित खाजगी क्षेत्राला प्राप्त होत असलेले अत्यंतिक महत्व आणि सार्वजनिक क्षेत्राचे कमी होत असलेले महत्व हे होय. भारताच्या आयात निर्यात व्यापाराचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा १९८०-८१ मध्ये १५% होता. तो २००९-१० मध्ये ३५% पर्यंत वाढला भारताच्या आयातीमध्ये अलीकडील काळात पेट्रोलियम पदार्थांना अधिक महत्व प्राप्त झाले आहे. खते, तृणधान्ये, लोखंड-पोलाद आणि मशिनरी यांना आंतरराष्ट्रीय व्यापारात १९८०-८१ पासून कमी महत्व प्राप्त होऊन मौल्यवान धातू व प्रतिष्ठेच्या वस्तू यांना अधिक महत्व प्राप्त होत आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात बॅकींग आणि वित्तीय रचनेमध्ये अनेक मूलगामी बदल झाले आहेत. स्वातंत्र्यानंतर भारतात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. या बँकेकडे देशाच्या वित्तीय क्षेत्राबाबत सर्वांगिण विकासाचे काम सोपविण्यात आले. नंतरच्या काळात सन १९०४ मध्ये सुरू झालेला सहकार चळवळीच्या यशापयशाची कारणे व विशेषत: ग्रामीण पतपुरवठ्या संदर्भात मूल्यमापन करण्यासाठी सन १९५१ मध्ये श्री. ए. डी. गोरवाला यांच्या अध्यक्षतेखाली 'अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समिती' स्थापना करण्यात आली. या समितीने आपला अहवाल १९५४ मध्ये सरकारला सादर केला यामध्ये 'सहकार हा अयशस्वी झाला आहे, पण तो यशस्वी व्हायलाच हवा' अशी शिफारस केली. या समितीची एक महत्वाची शिफारस होती ती म्हणजे, ग्रामीण भागात पतपुरवठा चळवळ योग्य पद्धतीने राबवावयाची असेल तर त्यासाठी एक भक्कम पतपुरवठा चळवळ योग्य पद्धतीने राबवावयाची असेल तर त्यासाठी एक भक्कम अशी यंत्रणा निर्माण करून त्याची जबाबदारी एखाद्या सार्वजनिक

क्षेत्रातील बँकेवर सोपविण्याची आवश्यकता आहे. त्यानुसार इंपिरिअला बँकेचे विलिनीकरण करून 'स्टेट बँक ऑफ इंडियाची' सन १९५५ मध्ये स्थापना करण्यात आली. शहरी व ग्रामीण भागातील पतपुरवठ्याचा विकास होऊन देशाची आर्थिक प्रगती साध्य व्हावी, ग्रामीण भागातील सावकारांचे प्रभूत्व कमी व्हावे, सर्वसामान्य लोकांना आवश्यक असणारे आर्थिक पाठबळ योग्य व्याजदराने व योग्य वेळी उपलब्ध व्हावे. तसेच खाजगी बँकाकडून कर्जदारांची होणारी पिळवणूक थांबावली यासाठी सन १९६९ मध्ये देशातील ज्या बँकांच्या ठेवी ५० कोटी रूपये व त्यापेक्षा अधिक होत्या अशा १४ खाजगी व्यापारी बँकेचे क्षेत्रातील ही बाब रचनात्मक सुधारणा करणारी अशीच होती. नंतर सन १९८० मध्ये देशातील ज्या बँकाच्या ठेवी २०० कोटी रूपयांपेक्षा अधिक होत्या अशा ६ खाजगी व्यापारी बँकाचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. परिणामी बँकानी प्राधान्याने कृषी क्षेत्र, लघुउद्योग, वाहतूक यासारख्या घटकांना कर्जपुरवठा सुरू केला. त्यामुळे ग्रामीण विकासास मदत होऊ लागली. आर्थिक उदारीकरणाच्या काळात बँकीग क्षेत्रामध्ये अत्यंत झपाट्याने अमुलाग्र स्वरूपाचे बदल होत आहेत. यामध्ये बँकीगच्या नवनवीन सुविधा उदा. मोबाईल बँकींग, इंटरनेट बँकींग, क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड, पेट्रो कार्ड तसेच लोकांना वीज बिले, टेलिफोन बीले व इतरही आवश्यक त्या सर्व सुविधा घरबसल्या उपलब्ध करून दिल्या जात आहेत. बँकींग क्षेत्रातील स्पर्धा वेगाने वाढत असल्याने विविध प्रकारच्या सेवाही ग्राहकांना उपलब्ध होत आहेत. बॅकीगमध्ये धोरणात्मक बदल होत आहेत. तसेच रोजगाराच्या विविध संधीही उपलब्ध होत आहेत.

### ✻ सामाजिक क्षेत्रातील बदल : (Social Service Changes)

लोकांच्या दैनंदिन राहणीमानात वेगाने सुधारणा घडवून आणणे. हे विकसनशील देशामधील आर्थिक वृद्धीचे प्रमुख उद्दिष्ट असते. गेल्या सहा दशकामध्ये आर्थिक नियोजनाद्वारो साध्य करण्यात आलेल्या आर्थिक प्रगतीमुळे भारतातील जनतेचे राहणीमान काही प्रमाणात आपण निखालसपणे उंचावू शकलो. पुरूष व स्त्रियांचे सरासरी आयुर्मान वाढले, साक्षरता प्रमाण वाढले मात्र बालमृत्युचे प्रमाण आजही अधिक आहे. सर्वसामान्य जनतेचे दैनंदिन जीवनमान उंचावण्यासाठी तिच्या हातात अधिकाधिक क्रियाशक्ती निर्माण होणे आवश्यक असते. त्यासाठी रोजगार निर्मिती महत्वाची ठरते. आर्थिक सुधारणा कालखंडात मात्र याबाबत समाजाच्या हातात निराशाच आली आहे. १९९०-९१ पर्यंत सार्वजनिक क्षेत्र हे रोजगार निर्मितीचे प्रमुख साधन होते. गेल्या २० वर्षात आर्थिक सुधारणांतर्गत अंमलाता आणलेल्या अनेक धोरणांचा परिणाम म्हणून सार्वजनिक क्षेत्रात अधिक रोजगार निर्माण होण्याची प्रक्रिया जवळ जवळ बंद झाली. लघु उद्योगातील रोजगार निर्मिती सुद्धा बंद होत आहे. दुसऱ्या बाजूला गरीब जनतेच्या हातातील एकूण क्रिया शक्ती घटल्यामुळे राष्ट्रिय पातळीवर अन्नधान्याचे अतिरिक्त साठे निर्माण झाले आहेत. या विरोधाभासाचे कारण म्हणजे अन्नधान्याच्या ग्राहक किमतीत सातत्याने होत असलेली वाढ हे होय. सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे वाहण्यात येणारा तांदूळ आणि गहू यांच्या प्रत्यक्ष मागणीत उत्तरोत्तर घट होत आहे. एकूणच देशाचे अन्नधान्यविषयक धोरण सदोष आहे. एकूणच देशाचे अन्नधान्यविषयक धोरण सदोष असल्याचे स्पष्ट होते. अन्नधान्याच्या बाजारातील किमतीवर तर सरकारचे कसलेच नियंत्रण

नाही त्यामुळे घाऊक व्यापारी नफा कमवताच परंतु त्यांच्या ही पेक्षा अलिकडे अन्नधान्याचे किरकोळ व्यापारी प्रचंड नफेतोटे करू लागले आहेत. अशा प्रकारे एका बाजूला ग्राहक व दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांचे शोषण होत आहे.

भारतासारख्या विकसनशील देशामध्ये दारिद्र्य निर्मुलन हे आर्थिक प्रगतीचे प्रमुख उद्दिष्टच्च असले पाहिजे. १९८०-१९९० या सहाव्या आणि सातव्या पंचवार्षिक योजना काळात दारिद्र्य निर्मूलनाच्या विविध कार्यक्रमामुळे दारिद्र्य रेषेखालील जनतेच्या प्रमाणात घट झाली. परंतु त्या नंतरच्या काळात एकंदरीत दारिद्र्याच्या प्रमाणात वाढ होत आहे. त्यातही ग्रामीण दारिद्र्याची व्याप्ती अर्थातच शहरी दारिद्र्यापेक्षा जास्त आहे. आवश्यक ते अन्न सेवन करण्याच्या क्षमतेचा अभाव हे जरी दारिद्र्याचे मूलभूत कारण असले तरी आरोग्य, शिक्षण, पिण्याचे स्वच्छ पाणी इत्यादी सामाजिक सेवा आवश्यक त्या प्रमाणात उपलब्धा करून देणे. हे कोणत्याही कल्याणकारी राज्यवस्थेत सरकारचे एक मुख्य कर्तव्य मानले जाते. स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने ही जबाबदारी काही प्रमाणात आग्रहाने पेलल्याचे दिसून येते. परंतु उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरणावर आधारलेल्या नव्या आर्थिक धोरणाचा पुरस्कार केल्या पासून केंद्र सरकार आणि सर्वच राज्य सरकारे यांची भूमिका आणि दृष्टीकोणाता फरक पडल्याचे दिसून येते. नव्या आर्थिक धोरणात वित्तीय तूट कमी करणे हे प्रमुख उद्दिष्ट असल्याने केंद्र आणि राज्य सरकारांनी शिक्षण, सार्वजनिक आरोग्य कुटुंबकल्याण ग्रामीण भागातील ग्रहबांधणी,पिण्याचे पाणी व इतर सामाजिक सेवा यावरील खर्चाबाबत संकुचित धोरण स्वीकारले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या आर्थिक प्रगतीचे फायदे प्रामुख्याने समाजातील धनदांडग्या आणि संघटित घटकांनाच झाले आहेत. सुमारे ५० वर्षे सर्व सोयी सवलती आणि सुविधांचा फायदा घेणारे मोठे उद्योगपती व्यापारी, सधन बागायतदार शेतकरी, दलाल, गलेलठ्ठ पगार घेणारे शासकीय व उद्योग सेवा क्षेत्रातील मोठे अधिकारी, संघटित सधन कामगार व व्यावसायिकचा सर्वांचा मिळून तयार झालेलय 'अभिजन वर्गच' स्वातंत्र्योत्तर काळातील आर्थिक विकासाच्या फायद्याचा प्रमुख हिस्सेदार आहे. दुसऱ्या बाजूला भूमिहीन शेतकरी अल्पभूधारक, छोटे शेतकरी, जिरायत शेती करणारे मध्यम शेतकरी, ग्रामीण कारगीर, आदिवासी शहरातील अत्यल्प वेतनावर काम करणारे असंघटित कामगार बालमजूर हा काबाडकष्ट करणाऱ्या श्रमिकांचा फार मोठा वर्ग आर्थिक प्रगतीच्या लाभापासून अजूनही मोठ्या प्रमाणात वंचितच राहिला आहे. या प्रश्नाची उकल करण्यासाठी सामूहिक कृतीची (Collective Action) अपरिहार्यपणे गरज आहे.

* **स्वयंअध्ययन प्रश्न :**

**खालीलपैकी योग्य पर्याय निवडा**

१) भारताने आर्थिक उदारीकरणाचे धोरण कोणत्या वर्षी स्वीकारणे?

अ) १९९०  ब) १९९१  क) १९९५  ड)२००१

२) तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत भारतात शेती विकासासाठी कोणता कार्यक्रम स्वीकारण्यात आला?

अ) प्रकर्षित कृषी विकास कार्यक्रम ब) सुधारित खते व अवजारांचाा कार्यक्रम

क) उच्च पैदास देणाऱ्या बियाणाचां कार्यक्रम ड) हरितक्रांती

३) धवलक्रांती.........उत्पादनाशी निगडीत आहे.

अ) मांस ब) मत्स्य क) दुध ड) सोयाबीन

४) ..........या पंचवार्षिक योजनेत अवजड व मूलभूत उद्योगांच्या विकासावर भर देण्याता आला.

अ) पहिल्या ब) तिसऱ्या क) चौथ्या ड) दुसऱ्या

५)...........या कालखंडास औद्योगिक सुधारणा कालखंड असे संबोधले जाते.

अ) १९५१ ते १९६० ब) १९८० ते १९९१

क) १९९१ ते २००० ड) २००१ ते २०१०

६) ..........या कालावधीत सेवा क्षेत्राचा भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा वेगाने वाढला.

अ) आर्थिक सुधारणा काळात ब) हरितक्रांतीच्या काळात

क) पहिल्या पंचवार्षिक योजना काळात ड) पाचव्या पंचवार्षिक योजनाकाळात

### १.२.४ भारतीय अर्थव्यवस्था आणि सर्वसमावेशक विकास (Indian Economy And Indusive Growth)

देशाच्या शाश्वत आर्थिक विकासाच्या दृष्टीने त्याचबरोबर भारताच्या पंचवार्षिक योजनेच्या मुळाशी असलेल्या कल्याणकारी राज्याच्या निर्मितीच्या उद्दिष्ट्याच्या दृष्टीने सर्वसमावेशक विकासाची संकल्पना महत्वाची ठरते. सर्वसमावेशक विकासाची संकल्पना महत्वाची ठरते. सर्वसमावेशक विकास ही एक व्यापक कल्पना असून त्यामध्ये अधिकाधिक लोकांना विकासात सहभागी करून घेण्यावर भर दिला जातो. विकासाची फळे समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहचविणे आणि विकासाच्या प्रक्रियेत अधिकाधिक लोकांना सहभागी करून घेणे. या दृष्टीने २१ व्या शतकात भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये विशेष प्रयत्न केले जात आहेत. सर्वसमावेशक विकास हा विकसनशील देशांसाठी एक परवलिचा शब्द बनला आहे. विकासाची प्रक्रिया ही सामाजिक न्याय वाढविणारी असावी. सर्वसमावेशक वृद्धीत सर्वांना सामाजिक आर्थिक व शैक्षणिक प्रगतीचे लाभ मिळावेत ही अपेक्षा असते. त्यामुळे समाजाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळू शकते. सर्वसमावेशक विकास कल्याणकारी राज्य या दोन्ही संकल्पना परस्पर पूरक आहेत. या दोन्ही संकल्पनांचा विचार नव्याने होत असला तरी प्राचीन काळापासून निरनिराळ्या स्वरूपात या संकल्पना मांडल्या गेल्या आहेत. उदा. कौटिल्याची आदर्शशासन व्यवस्था, प्लेटोचे रिपब्लिक या

प्राचीन तर अर्वाचिन काळातील गांधीवादातील अंत्योदय भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम हरितक्रांतीचे जनक डॉ. एम.एस. स्वामीनाथन व दुग्ध क्रांतीचे डॉ. वर्गीस कुरियन यांच्या स्वप्नातील भारत यासर्व संकल्पनांचा मूळ गाभा कल्याणकारी राज्य व सर्वसमावेशक विकास हाच आहे.

### ❊ सर्वसमावेशक विकासाच्या संकल्पनेचे सैद्धांतिक विश्लेषण (Theortical Explanation of Indusive Growth)

जगातील बहुसंख्य राष्ट्रांनी त्यांच्या शाश्वत आर्थिक विकासासाठी सर्वसमावेशक विकासाचे तत्व अंगीकारले आहे. भारतामध्ये विविध पंचवार्षिक योजनांच्या उद्दिष्ट्यांमध्ये ही सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टीने वाटचाल केल्याचे दिसून येते. गरीबी हटाओ कार्यक्रम, वीस कलमी कर्यक्रम, कृषी विकासाला प्राधान्य रोजगार निर्मिती, महिला व बालविकास सर्व शिक्षा अभियान यासारख्या योजनाद्वारे सामाजिक विकास करण्याचा प्रयत्न करण्यात आला. ११ व्या पंचवार्षिक योजनेचा मुख्य उद्देश सर्वसमावेश विकास हाच होता. १२ व्या पंचवार्षिक योजनेतही हाच प्रयत्न जाणीवपूर्वक केला जात आहे. आर्थिक विकास मोजण्याचा दरडोई उत्पन्न व राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ हा जरी महत्वाचा निकष महत्वचा मानला जातो. त्या दृष्टीनेच आर्थिक सुधारणा कालखंडात मानव विकास निर्देशांक ह महत्वाचा मानला जाता आहे. सर्वसमावेशक वृद्धीच्या संकल्पनेत आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत होणाऱ्या विषमतेबरोबरच सामाजिक वंचिततेला महत्व प्राप्त झाले आहे.

'सामाजिक वर्जन' ही एक प्रक्रिया आहे काही समुदायांना, गटांना किंवा व्यक्तिना आपण ज्या समाजात राहतो. त्या समाजात आपण पूर्णत: अथवा अंशत: वर्जित आहोत असे वाटते. नोबेल पारितोषिक विजेते डॉ. अमर्त्य सेन यांनी या प्रक्रियेला (Capabilitiy Deprevation) असे म्हटले आहे. विल्सन या लेखकाने या प्रक्रियेला Social Dislocation असे म्हटले आहे. आपल्या देशाचा खऱ्या अर्थाने विकास साधावयाचा झाल्यास सर्वसमुदायांना सर्वक्षेत्रात प्रतिनिधित्व देऊन त्यांना देशाच्या मुख्यप्रवाहात आणणे अत्यावश्यक आहे. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. सर्वसमावेशक विकासाचे धोरण समजून घेण्यासाठी आपल्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीव्यवस्था व अस्पृश्यतेविषयीचे मूल्यमापन समजून घ्यावे लागते. 'भारतातील जाती', 'जातीयतेचे उच्चाटन' 'दि अनटचेबल्स' 'हिंदू धर्माचे तत्वज्ञान' या लिखाणात त्यांचे विचार प्रतिबिंबित झाले आहोत. 'जात' हा राक्षस आहे. आणि जोपर्यत त्या राक्षसाला आपण नष्ट करीत नाही. तोपर्यंत भारतीय समाजात समानता व सर्वसमावेशक विकास होऊ शकत नाही. अशी त्यांची धारण होती. देशातील सामाजिक आर्थिक समस्या सोडविण्यासाठी स्टेटची (सरकारची) प्रमुख जबाबदारी आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते सर्वांना समान हक्क असले पाहिजेत, मानवी हक्कांचे उल्लंघन होऊ नये यासाठी कायदेशीर तरतूद सर्वांना सामाजिक राजकीय नागरी व आर्थिक क्षेत्रात शिरकाव सहभाग आणि महत्त्वाचे म्हणजे गरिबांच्या सबलीकरणासाठी व सर्वसमावेशक विकासासाठी सरकारने निश्चित कृती योजना राबविणे गरजेचे आहे. महिला आदिवासी, भटके, गरीब आणि अस्पृश्य हे घटक आज ही सामाजिकदृष्ट्या बहिष्कृत आहोत. म्हणून डॉ. आंबेडकर सुचवतात. वर्गनिहाय सर्वसमावेशक

धोरणामुळे सामाजिक भेदभाव व असमानतेच्या परिणामाला उत्तर मिळू शकते. भेदभाव रहित आर्थिक संरचनेत बहिष्कृत वर्गांना देशाच्या आर्थिक विकासात सामावून घेणे गरजेच आहे. उदा. उद्योगधंद्यांची बाजारपेठ, खासगी शिक्षण, घरांची सोत्र करणारी व्यवस्था या क्षेत्रात बहिष्कृत मंडळीना प्रवेश मिळेलच असे सांगता येत नाही. म्हणून या प्रश्नाची लावण्यासाठी पर्यायी उपाययोजना म्हणून ते 'समान संधी' (Equal Opportunity) चा पर्याय सुचवतात. हेच डॉ. आंबेडकरांचे सर्वसमावेशक विकासाबाबतचे धोरण आहे.

डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते, दारिद्र्याचा प्रत्यक्ष संबंध हा मनुष्यातील मूलभूत क्षमतांपासून दुरावलेल्या गरिबांशी अधिक जवळचा आहे. गरिबांच्या सुप्त क्षमताशक्तीत आणि कौशल्यात जसजसी वाढ होत जाईल तसतसी त्यांना दारिद्र्यातून मुक्त होण्याची प्रेरणा मिळेल. यासाठी विकासाचा पाया हा सर्वसमावेशक वृद्धी या संकल्पनेवर आधारित असणे आवश्यक आहे. त्यांच्या मते, कृषी क्षेत्र आणि बिगर कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या उत्पन्नातील विषमता कमी करणे हे सर्वसमावेशक वृद्धीचे उद्दिष्टे असले पाहिजे. सन २००८ च्या (UNDP) च्या अहवालानुसार समाजातील सर्व प्रकारच्या उत्पन्न गटातील लोकांचा उत्पादनातील सहभाग, विकास आणि वितरणातील समानता महत्वची आहे. ही दीर्घकालीन प्रक्रिया असून रोजगार निर्मिती करणे आवश्यक आहे. कारण त्यामुळे विकासापासून वंचित असणाऱ्या लोकांच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते

### ❊ सर्वसमावेशक विकासाचे निकष (Indicators of Indusive Growth)

सर्व समावेशक विकासाची भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात व्यवहारिकता पडताळून पाहताना काही निकष विचारण होणे क्रमप्राप्त ठरते. काही प्रमुख निकष आपणास पुढीलप्रमाणे अभ्यासता येतील.

#### १) दारिद्र्य निर्मूलन (Poverty Elimination)

भारतासारख्या बहुसंख्य विकसनशील देशामध्ये सार्वत्रिक दारिद्र्य ही प्रमुख समस्या आहे. दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी देशातील शेती, उद्योग व सेवा क्षेत्रातील रोजगार संधीत वाढ करण्याची आवश्यकता आहे. मानव संसाधनाच्या कौशल्ये विकसित करण्याची आवश्यकता आहे. भारतामध्ये आज जवळजवळ २७% लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहे. गेल्या ६० वर्षात दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण जरी घटले असले तरी दारिद्र्यरेषेखाली राहणाऱ्या लोकांची संख्या ३५ कोटी पर्यत वाढलेली आहे. याच्यामध्ये सर्वसमावेशक विकास साध्य करावयाचा असेल तर दारिद्र्यनिर्मूलनाच्या योजना आखून त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची गरज आहे.

#### २) रोजगार निर्मिती (Employment Generation)

देशामध्ये अस्तित्वातील कर्त्या लोकसंख्येला (श्रम शक्ती) रोजगार उपलब्ध करून देणे ही बाब आर्थिक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आहे. देशात योजना काळात रोजगार निर्मितीचे अनेक

प्रयत्न करण्यात आले मात्र आजही बेरोजगारांची संख्या मोठ्या प्रमाणात असलेली दिसते. देशात सुशिक्षितांमधील बेरोजगारी तसेच निरक्षरांमधील बेरोजगारी ही वाढताना दिसते. आर्थिक सुधारणा कालखंडात रोजगाराच्या नवनवीन संधी तंत्रवैज्ञानिक बदलामुळे निर्माण होत आहेत. मात्र त्या मिळविण्यासाठी किमान कौशल्याची आवश्यकता असते. अशी कौशले विकसित करण्यासाठी योग्य ते शिक्षण व प्रशिक्षण समाजाला पुरविण्याची आवश्यकता आहे. समाजातील विविध स्तरातील व्यक्तिच्या उत्पन्न पातळीत समतोल प्रमाणात वाढ घडवून आणण्यासाठी सर्वसमावेशक विकासाची निकड भासते.

### ३) जीवनावश्यक वस्तूंची उपलब्धता (Availabilty of Consumable Goods)

लोकांना राहणीमानाचा वाजीव दर्जा प्राप्त करून देण्यासाठी जीवनावश्यक वस्तूंची उपलब्धता करून देणे हे शाश्वत विकासाच्या दृष्टीने आवश्यक ठरते. सर्वसमावेशक विकासाच्या निकषात उपभोग्य वस्तूंची उपलब्धता या घटकास खूप महत्व आहे. त्यादृष्टीने सरकार सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून अल्पउत्पन्न गटातील लोकांना गहू, तांदुळ, साखर, खाद्यतेल, रॉकेल यासारख्या वस्तूंचा पुरवठा अल्पकिमतीमध्ये करत असते. सर्वसामन्य लोकांच्या दृष्टीने पिण्याचे पाणी, आरोग्याच्या सुविधा, भाजीपाला, दूध, पेट्रोल, डिझेल, खाद्यतेल यासारख्या वस्तूंच्या रास्त किमती व त्यांची उपलब्धता ही बाब महत्वाची ठरते. त्या दृष्टीने देशाचा सर्वसमावेशक विकास करीत असताना सरकारने या जीवनावश्यक वस्तूंच्या उपलब्धतेकडे जाणिवपूर्वक लक्ष देण्याची आवश्यकता असते.

### ४) मागणीची कमतरता (Deficiency of Demand)

मागणीतील कमतरता भरून काढणे ही बाब सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आहे. डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते बाजारपेठेतील मागणीची कमतरता भरून काढण्यासाठी श्रीमंतांची श्रीमंती व गरीबांची गरीब कमी करणे यासाठी सरकारने प्रयत्न करण्याची गरज आहे. गरीबांच्या मागणीत वाढ करण्यासाठी त्यांचे दरडोई उत्पन्न वाढणे आवश्यक आहे. त्यासाठी सरकारने विविध प्रकारच्या रोजगार व स्वयंरोजगाराच्या योजना आखून त्याची परिणामकारकपणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. गरीबांच्या खरेदीशक्तीत वाढ झाल्यास आपोआपच मागणीतील कमतरता कमी होवून सर्वसमावेशक विकास होण्यास मदत होईल.

### ५) ग्रामीण व शहरी विषमता (Rural and Urban Disparity)

सर्व समावेश विकासाच्यो संकल्पनेते व्यक्ती-व्यक्तीमधील प्रादेशिक तसेच ग्रामीण व शहरी विषमता कमी होणे अभिप्रेत आहे. जागतिक बँकेच्या सर्वसमावेशक विकासाच्या संकल्पनेत गरीब व श्रीमंत व्यक्तिच्या उत्पन्नातील विषमता कमी करण्यावर भर दिला आहे. भारतात पंचवार्षिक योजना काळात शासनाने राबविलेल्या विकास कार्यक्रमांचा लाभ ग्रामीण भागापेक्षा शहरी भागाला अधिक झाला आहे. त्यामुळे ११ व्या व १२ व्या पंचवार्षिक योजनेत ग्रामीण व शहरी विषमता कमी करण्यावर भर देण्यात आला आहे. त्याचा फायदा सर्वप्रकारच्या सुविधांपासून वंचित असलेल्या लोकांना होण्यास मदत

होईल.

## ✻ भारताचे सर्वसमावेशक विकासाचे धोरण (Policy of Inclusive Growth of India)

भारताने स्वातंत्र्योत्तर काळात १९५१ पासून पंचवार्षिक योजनांतर्गत आर्थिक विकासाचे धोरण अवलंबिले स्वातंत्र्यपूर्व कालखंडात भारतीय अर्थव्यवस्थेची झालेली घसरण दुरूस्त करणे हे मुख्य उद्दिष्ट होते. त्यानुसार पहिली पंचवार्षिक योजना पूर्णपणे शेतीच्या विकासासाठी राबविण्यात आली. त्यानंतरच्या दुसऱ्या योजनेमध्ये मूलभूत व अवजड उद्योगांच्या विकासावरा भर देण्यात आला. तिसऱ्या योजनेपासून सातव्या योजनेपर्यंत भारताच्या नियोजनाची प्रमुख उद्दिष्ट्ये दारिद्र्य निर्मूलन, रोजगार निर्मिती, आर्थिक विषमता कमी करणे, सामाजिक न्यायासह आर्थिक विकास, प्रादेशिक विषमता कमी करणे, लघु व कुटीर उद्योगांचा विाकस करणे तसेच ग्रमीण विकास ही होती. १९५१ ते १९९० या काळात अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्राकडून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली गेली. यासाठी आवश्यक असणारे भांडवल कर्जाच्या स्वरूपात आंतरराष्ट्रीय पातळीवरूनही उभारले गेले. त्याचा परिणाम भारतावर कर्जाचा सापळा निर्माण झाला. चौथ्या पंचवार्षिक योजनेत निश्चित करण्यात आलेले स्थैर्यासह आर्थिक विकास हे उद्दिष्ट भारतात सर्वसमावेशक आर्थिक विकास करण्याच्या दृष्टीने महत्वाचे पाऊल होते. पाचव्या पंचवार्षिक योजनेत गरिबी हटाओ ही घोषणा तसेच २० कलमी कार्यक्रम हा दारिद्र्य निर्मूलन आणि समाजाच्या राहणीमानात सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने महत्वचे उपक्रम होते. रोजगार वृद्धीच्या दृष्टीने महाराष्ट्रासारख्या घटक राज्यात १९७२ मध्ये सुरू करण्यात आलेली 'रोजगार हमी योजना' ही देश पातळीवर स्वीकारण्यात आली आहे. देशातील अकुशल व्यक्तीना रोजगाराच्या संधी प्राप्त करून देऊन त्यांच्या खरेदी शक्तीत वाढ घडवून आणण्यास ही योजना महत्वाची ठरत आहे. १९८० नंतर लघु आणि कुटीर उद्योगांच्या विकासातून ग्रामीण व शहरी भागात निर्माण होणारीी रोजगार निर्मिती ही शाश्वत विकासाला प्रेरक ठरत आहे. याबरोबरच योजना काळात सरकारने शैक्षणिक धोरणात सर्वसमावेशकतेच्या दृष्टीकोनातून काही बदल केले आहेत. आरक्षणाचे धोरण, पंचायतराज व्यवस्थेचा स्वीकार, महिलांना शासकीय नोकऱ्यांमध्ये आरक्षण यासारखे उपक्रम राबविले आहेत. गेल्या सहा दशकात सर्वसमावेश विकासाच्या दृष्टीने विविध प्रकारच्या योजना शासकीय पातळीवर राबविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये पुढील काही योजना सांगता येतील इंदिरा आवास योजना, कामासाठी अन्न योजना, संजय गांधी निराधार योजना, आश्वाशित रोजगार योजना, अंत्योंदय योजना, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, जवाहर रोजगार योजना, प्रधानमंत्री ग्रामोद्य योजना, भारत निर्माण कार्यक्रम सूक्ष्म वित्त पुरवठा व प्रकर्षित शेती विकास योजना यासारख्या योजना सर्वसमावेशक व शाश्वत विकासाच्या दृष्टीने देशभरात राबविल्या जात आहेत.

## ✻ भारतातील सर्वसमावेशक विकास
## (Inclusive Growth in India-Challenges and alternatives)

भारताने १९९१ पासून नव्या आर्थिक धोरणाचा स्वीकार केला. खासगीकरण उदारीकरण आणि

जागतिकीकरण या त्रिसूत्रीवर आधारित असे अनुषंगिक बदल आर्थिक धोरणामध्ये केले. त्याचा अनुकुल व प्रतिकुल परिणाम कृषी, उद्योग व सेवा क्षेत्रावर झाल. भारतीय अर्थव्यवस्थेच्या संरचनात्मक चौकटीमध्ये उपलब्ध मनुष्यबळाला पुरेशा भौतिक व सामाजिक सुविधा प्राप्त करून देण्यात अडथळे निर्माण होऊ लागले. आर्थिक उदारीकरणाच्या काळात अर्थव्यवस्थेच्या विकासाचा वेग ३.५% वरून ९% पर्यंत पोहचला. कृषी अर्थव्यवस्था सेवाप्रधान अर्थव्यवस्था बनू लागली. भारतात सध्या ६०% घटक सेवा उद्योगावार आधारलेले आहेत. माहिती तंत्रज्ञानाचा विकास हा एक महत्वाचा पैलू देशाच्या विकासाची गती वाढविण्यास प्रेरक ठरू शकतो. तथापि खेड्यात राहणारे लोक विकासापासून वंचित आहेत. अल्पभूधारक शेतकरी शेतमजूर आणि कष्टकरी हे कृषी उत्पादनात महत्वाचे असूनही सामाजिक व आर्थिक विकासापासून दूर आहेत. महिला, मुले, व मागासवर्गीय लोक हे सुद्धा विकासापासून दूर आहेत. वाढत्या आर्थिक गरजा आणि वाढती लोकसंख्या यामध्ये मेळ घालण्यासाठी विकास साधनांची नियोजन करावे लागेल. सध्या आर्थिक सत्ता ही मुठभर लोकांच्या हाती एकवटली आहे. देशात १% लोकांच्या हाती १५.९% संपत्ती आहे. तर ५% लोकांच्या हाती ३८.३%संपत्ती आहे. उर्वरीत लोक मात्र ४५.८% संपत्तीमध्ये अल्पप्रमाणात वाटेकरी आहेत. शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासपुढील समस्यांचा आढावा घेतला असता असे दिसते की, दारिद्र्य बेरोजगारी आणि शेती क्षेत्रातील  घसरण या भारतापुढील प्रमुख समस्या आहेत. त्यामुळे राज्यांतर्गत प्रादेशिक विषमता वाढताना दिसते. गेल्या काही वर्षात देशात चलनपुरवठा मोठ्या प्रमाणावर झाला आहे. जागतिक वातावरण अनिश्चित वाढत आहेत. युरो डॉलर व अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रूपया दुबळा होत आहे. अनेक चांगल्या योजना, आराखडे व धोरणे असून त्यांची अंमलबजावणी मात्र मंद गतीने होत आहे. त्यामुळे विकासाची फळे अपेक्षित वर्गापर्यंत पोहचत नाहीत.

१२ व्या पंचवार्षिक योजनेत सर्वसमावेशक व शाश्वत विकास हे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. या अनुषंगाने सर्वसमावेशक विकासासाठी पुढील काही महत्वाच्या उपाययोजना करून सर्व समावेशक विकासाची व्यूहरचना तयार करण्याची आवश्यकता आहे.

१) ग्रामीण संरचना भक्कम केली पाहिजे.

२) कृषी क्षेत्रातील कामगिरी सुधारली पाहिजे

३) शिक्षणाचा दर्जा आणि कौशल्य विकासासाठी अधिक सशक्त प्रयत्न केले पाहिजेत.

४) मागासलेल्या व अपेक्षित वर्गासाठी विशेष विकास कार्यक्रम राबविले पाहिजेत.

५) ग्रामीण आरोग्य योजनामध्ये संपूर्ण बदल केला पाहिजे.

६) नागरी विकास संरचना निर्दोष केल्या पाहिजेत. तसेच शहर व ग्रामीण विकासातील अंतर भरून काढले पाहिजे.

७) देशातील बालमजूरी, महिलांचे शोषण आणि दुर्बल घटकांची उपेक्षा यासारख्या प्रश्नाकडे

गांभिर्याने पाहिले पाहिजे.

८) रूढी, परंपरा व अंधश्रद्धांचा प्रभाव कमी करून लोकांमध्ये विकासाबाबत जाणीव जागृती करण्याची गरज आहे

९) चांगल्या सुशासनास रचनात्मक प्रयत्नांची जोड देऊन भावी काळात खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील भागीरी वाढविली पाहिजे.

१०) बहुराष्ट्रीय उद्योगांनी सामाजिक जबाबदारीचे प्रकल्प काळजीपूर्वक आखले पाहिजेत. त्यामुळे संरचनात्मक विकास होऊन विविध सामाजिक क्षेत्रात लोककल्याणकारी योजना गतीने कृतीत येऊ शकतील.

११) उद्योगांचे विकेंद्रीकरण करून आर्थिक सुधारणातून नवे सामाजिक आर्थिक व राजकीय वातावरण तयार केले पाहिजे.

अशा प्रकारे सर्वसमावेशक विकास साध्य करताना सर्व सुधारणांची दिशा ही शाश्वत स्वरूपाची असली पाहिजे. सहभागी विकास ही केवळ सरकारची जबाबदारी नसून देशातील उद्योग समूह तसेच सेवाभावी संस्थांनी सुद्धा त्यात वाहा उचलला पाहिजे. सध्याच्या विकास योजना अशा पद्धतीने राबविल्या पाहिजेत की भावी पिढीच्या गरजासुद्धा योजकतेने पूर्ण होऊ शकतील.

✲ **स्वयंअध्ययन प्रश्न :**

**खालीलपैकी योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा.**

१) सर्वसमावेशक विकास हे प्रमुख उद्दिष्ट भारताने कोणत्या पंचवार्षिक योजनेत स्वीकारले?

अ) पहिल्या ब) आठव्या क) दहाव्या ड) अकराव्या

२) सर्वसमावेशक विकासासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर खालीलपैकी कोणता पर्याय सूचवितात?

अ) रोजगारात वाढ ब) समान संधी क) दारिद्र्य निर्मूलन ड) वरील सर्व

३) ......हा सर्वसमावेशक विकासाचा निकष आहे.

अ) लोकसंख्या नियंत्रण ब) दारिद्र्य निर्मूलन क) शेती विकास ड) औद्योगिक विकास

४) डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते, बाजारातील मागणीची कमतरता भरून काढण्यासाठी..............ची आवश्यकता आहे.

अ) लोकसंख्येचा जननदर कमी करणे ब) शैक्षणिक सुविधा वाढविणे

क) गरीब व श्रीमंत यातील अंतर कमी करणे ड) लोकांना आरोग्याविषयक सुविधा पुरविणे

५) महाराष्ट्रात रोजगार हमी योजना............यावर्षी सुरू करण्यात आली.

अ) १९५१ ब) १९७२ क) १९९१ ड) १९९०

६) नव्या आर्थिक धोरणाची त्रिसूत्री कोणती आहे?

अ) उदारीकरण जागतिकीकरण व आधुनिकीकरण

ब) जागतिकीकरण खाजगीकरण व सार्वत्रीकरण

क) उदारीकरण खाजगीकरण व सामाजिकीकरण

ड) खाजगीकरण उदारीकरण व जागतिकीकरण

७) भारताच्या १२ व्या पंचवार्षिक योजनेचे लक्ष्य कोणते आहे?

अ) सर्वसमावेशक विकास ब) शाश्वत विकास

क) अधिक सर्वसमावेशक व वेगवान आर्थिक विकास ड) प्रदूषण नियंत्रण

## २.३ सारांश

भारतीय अर्थव्यवस्था ही एक विकसनशील अर्थव्यवस्था आहे. विकसित देशांशी तुलना करता भारताचे दरडोई उत्पन्न कमी आहे. देशातील बहुतांश कर्ती लोकसंख्या शेतीक्षेत्रात गुंतली असून राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा हिस्सा मात्र घटत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात जननदर उच्च राहिल्याने लोकसंख्येत अतिरिक्त वाढ झाली व तिचा भार प्रामुख्याने शेतीक्षेत्रावर पडला. अल्पविकसितपणाचे आणखी एक महत्वाचे शेतीक्षेत्रावर पडला. अल्पकिवसितपणाचे आणखी एक महत्वाचे वैशिष्टय म्हणजे भांडवल निर्मितीचा अल्पदर होय. देशात ग्रामीण व शहरी भागात उत्पन्न वितरणात कमालीची विषमता आहे. मानवी भांडवलाचा दर्जा हा निकृष्ट स्वरूपाचा आहे. देशात तांत्रिक मागासलेपणा असल्याने विकसित देशांशी तुलना करता भारताची औद्योगिक उत्पादकता अत्यंत कमी आहे. परिणामी उत्पन्नपातळी कमी असल्याने राहणीमानाचा दर्जासुद्धा घसरला आहे. अल्पविकसित पणामुळे देशात दारिद्र्य व बेरोजगारीचे प्रमाण मोठे आहे. औद्योगिक दृष्ट्या प्रगत राष्ट्रांप्रमाणे भारतात धाडसी संयोजक व नेतृत्वाचा अभाव आहे.

भारताने १९४७ पासून मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. मिश्र अर्थव्यवस्था म्हणजे ज्या आर्थिक पद्धतीत भांडवलशाही व समाजवादी अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये दिसून येतात आणि ज्यामध्ये केंद्र सरकारमार्फत आर्थिक व्यवहारांचे नियमन केले जाते अशी अर्थव्यवस्था होय. मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्राचे सहअस्तित्व असते. राष्ट्राच्या दृष्टीने अतिमहत्वाचे असणारे उद्योग सार्वजनिक मालकीचे तर इतर उद्योग खाजगी क्षेत्राकडे सुपूर्द केलेले असतात. किंमतयंत्रणा आणि सरकारी हस्तक्षेप या दोन्ही बाबी मिश्र अर्थव्यवस्थेत महत्वाच्या असतात. आर्थिक नियोजन हे मिश्र अर्थव्यवस्थेचे प्रमुख वैशिष्ट्य

आहे. तसेच देशातील मूलभूत उद्योगामध्ये सार्वजनिक क्षेत्राचा सहभाग हा महत्वाचा असतो. उत्पादन कार्याची काही महत्वाची जबाबदारी जरी खाजगी क्षेत्राकडे सोपवली असली तरी त्यावर सरकारचे नियंत्रण असते सरकार अर्थव्यवस्थेतील मक्तेदारीचे नियंत्रण आणि नियमन करण्यासाठी प्रयत्नशील असते. तसेच समाजातील उत्पन्न व संपत्तीतील विषमतेची दरी कमी करण्यासाठी विविध मार्गांनी प्रयत्न करीत असते. उपभोक्ता हा अत्यंत महत्वाचा घटक मानून त्याचे सर्वभौमत्व अबाधित राखण्याचा प्रयत्न केला जातो. एकंदरीत सार्वजनिक व खाजगी क्षेत्राच्या सहाय्याने अर्थव्यवस्थेचा विकास करण्याचा प्रयत्न केला जातो.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय अर्थव्यवस्थेत मूलभूत असे रचनात्मक बदल घडून आलेले आहेत. स्वातंत्र्य प्राप्त झाले त्यावेळी देशातील ७०% पेक्षा अधिक लोकसंख्या शेतीवर आधारित होती. राष्ट्रीय उत्पन्नात जवळ-जवळ ६०% हिस्सा शेती क्षेत्राचा होता. या क्षेत्रात अनेक स्थित्यंतरे घटून शेतीच्या विकासाचा दर घटला आहे. सध्या एकूण राष्ट्रीय उत्पनात शेतीचा हिस्सा १३.५% एवढा अल्प राहिला आहे. उद्योग व सेवा क्षेत्राची प्रगती मात्र आर्थिक सुधारणा कालखंडात झपाट्याने झाली आहे. राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचे योगदान ६०% राहिले आहे. गेल्या ६० वर्षात देशाची विविध क्षेत्रातील प्रगती लक्षणीय स्वरूपात झाली असली तरी समाजा समोरील दारिद्र्य, बेरोजगारी, राहणीमानाचा निकृष्ट दर्जा, भाववाढ यासारखे प्रश्न आजही अनुत्तरीतच आहेत.

भारताने स्वातंत्र्योत्तर कालखंडात पंचवार्षिक योजनांच्या सहाय्याने कल्याणकारी राज्याच्या निर्मितीचे स्वप्न डोळ्यासमोर ठेवले. त्या अनुषंगाने विविध योजना राबविल्या गेल्या. ११ व्या पंचवार्षिक योजनेपासून सर्वसमावेशक विकासावर अधिक भर दिला गेला. त्यामध्ये दारिद्र्य निर्मूलन रोजगार निर्मिती, जीवनावश्यक वस्तूंची उपलब्धता मागणीची कमतरता, ग्रामीण व शहरी विषमता या प्रमुख निकषांचा समावेश होतो. भारताने जरी सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टीने प्रयत्न सुरू ठेवले असले तरी त्यामध्ये अजुन ही जाणीवपूर्वक प्रयत्न सामूहिके पातळीवर होण्याची आवश्यकता आहे.

## १.४. पारिभाषिक शब्द

१. अल्पविकसितपणा - उपलब्ध श्रमशक्ती व नैसर्गिक साधन संपत्तीचा पूर्णपणे वापर करण्याची क्षमता नसणे

२. सर्वसमावेशक विकास - देशातील सर्व उत्पन्न स्तरातील लोकांना सामावून घेऊन करण्यात येणार विकास

३. शाश्वत विकास - ''शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो भविष्यकालीन पिढ्यांच्या त्यांच्या स्वत:च्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी कोणतीही तडजोड न करता सध्याच्या गरजा पूर्ण करणे होय. ''

## १.५. वस्तूनिष्ठ प्रश्नांची उत्तरे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १.२.१ - | १ - क | २ - क | ३ - ड | ४ - ड |
| | ५ - ब | ६- ड | ७ - अ | ८ - ब |
| **१.२.२. -** | १ - क | २ - ब | ३ - क ४ - ड | ५ - ब ६ - ब |
| **१.२.३. -** | १ - ब | २ - क | ३-क | ४- ड |
| ५ - ब | ६ - अ | | | |
| **१.२.४.** | १ - ड | २ - ब | ३ - ब | ४ - क |
| | ५ - ब | ६ - ड | ७ - क | |

## १.६. सरावासाठी स्वाध्याय

**अ) टीपा लिहा.**

१. सर्वसमावेशक विकास

२. सर्वसमावेशक विकासाचे निकष

३. भारताच्या शेती क्षेत्रातील बदल

४. मिश्र अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये

५. विकसनशील अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये

## १.७.अधिक वाचनासाठी संदर्भ :


1. Dutta Sundarm : "Indian Economy" S. Chand and Company Ltd., Ramnagar, New Delhi 65th revised edition, 2012.
2. Misra Puri : "Indian Economy" Himalaya Publisling House, Mumbai 28 th revised edition 2010.
3. R.K. Lekhi, "The Economics of Development and Planning" Kalyani Publishers, New Delhi, 9th revised edition, 2004.
4. P. K. Dhar, "Indian Economy" Kalyani Publishers, New Delhi, 9th edition, 2001
5. K. Munirathnam Naidu & others Inclsive Growth A New Strategy for Development "The Indian Economic Journal Special Issue" December, 2011.
6. Mohan Patel & Rajesh Patel Challenges of Indusive Growth" The Indian Economic Journal, Special Issues December 2011

७. डॉ. घाटगे/ डॉ. अनिल वावरे : 'भारतीय अर्थव्यवस्था', निराली प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१०

८. डॉ. जी. एन. झामरे : 'भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, पाचवी आवृत्ती २०१०.

९. डॉ. भालचंद्र मुणगेकर 'स्वातंत्र्योत्तर भारताच्या आर्थिक विकासाचे राजकीय अर्थशास्त्र' अध्यक्षीय भाषण मराठी अर्थशास्त्र परिषद, २४ वे वार्षिक अधिवेशन, मिरज ५ ते ७ नोव्हेंबर, २०००.


❖❖❖